## हैदराबाद गॅझेटियरच्या जीआरबाबत सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल

नवी दिल्ली, दि. १० प्रतिनिधी

राज्य सरकारने काढलेल्या हैदराबाद गॅझेटियर शासन निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. आंदोलकांची बाजू ऐकल्याशिवाय निर्णय होऊ नये यासाठी ॲड. राज पाटील यांच्यावतीने हे कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. राज्य सरकारच्या २ सप्टेंबर रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयाला कोणी आव्हान दिलं तर आमची बाजू ऐकल्याशिवाय निर्णय केला जाऊ नये, असे म्हणणे मांडत कॅव्हेट दाखल करण्यात आलं आहे. त्यामुळे, सरकारच्या जीआर विरोधात न्यायालयात याचिका दाखल झाल्यास आता आंदोलकांची बाजू देखील ऐकली जाणार आहे. दरम्यान, राज्य सरकारनेही कॅव्हेट दाखल करावे अशी मागणी वकील राज पाटील यांच्यावतीने करण्यात आली आहे.


मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | गुरुवार, ११ सप्टेंबर २०२५ | वर्ष: १ | अंक:९९ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


अग्राग्रलेख

## खरीखरी

### दुसरे राधाकृष्णन

भारताची राज्यघटना जनतेला समर्पित झाल्यावर देशाचे पहिले राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद होते आणि पहिले उपराष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन हे होते. १९५२ ते १९६२ दहा वर्षे हीच जोडी जोडीगोडीने होती. १९६२ साली डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांचा कार्यकाळ संपल्यावर त्यांनी पटना येथे सदाकत आश्रमात आपला मुक्काम हलविला होता. अत्यंत साधी राहणी, अतिशय विद्वान आणि त्यासोबत उच्च विद्याविभूषित असलेल्या डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांच्या कार्यकाळामध्ये सर्वपल्ली राधाकृष्णन दहा वर्ष उपराष्ट्रपती होते. १९६२ सालामध्ये ते पहिले राधाकृष्णन राष्ट्रपती झाले. काल दक्षिण भारताचे दुसरे राधाकृष्णन उपराष्ट्रपती पदावर विराजमान झालेले आहेत. एनडीएने इंडिया आघाडीला डॉक्टर राधाकृष्णन यांना समर्थन देण्याचे आवाहन केले होते. मात्र इंडिया आघाडीने आपला उमेदवार उभा केला. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश सुदर्शन यांची उमेदवारी इंडिया आघाडी जाहीर केली. दक्षिण भारताचा उमेदवार विरुद्ध दक्षिण भारताचा उमेदवार अशी ती खेळी होती. तेलुगु अस्मितेच्या बहुतांश तेलुगू भाषिक खासदार त्यांना मते देतील असा साधारण कयास होता. चंद्राबाबू नायडू यांच्याशी त्यांचे अतिशय जवळचे संबंध होते. त्यामुळे तेलंगणा आणि आंध्र प्रदेश येथील तेलुगु भाषिक खासदार त्यांनाच मते देतील हा अंदाज खोटा ठरला. काँग्रेस आणि काँग्रेस प्रणित इंडिया आघाडी हवा तयार करण्यात आघाडीवर होती परंतु भारतीय जनता पक्ष ज्या हिरीरिने आपल्या उमेदवाराच्या विजयासाठी जीव तोडून मेहनत करतो. तो प्रकार इंडियाकडे म्हणजेच इंडिया आघाडीकडे दिसला नाही. इंडिया आघाडीपेक्षा दीडपट पेक्षा जास्त मते मिळवून दुसरे राधाकृष्णन मोठ्या फरकाने निवडून आलेले आहेत. राहुल गांधी यांची उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीवेळी चालू असलेली बिहारमधील मत अधिकार यात्रा त्यांना व त्यांच्या नेतृत्वाला लाभदायी ठरेल असे त्यांना वाटते. पण राजकारणातील बारकावे ज्या कौशल्याने भाजप प्रणित एनडीएने राबविले होते तसे इकडे होत नाही. न्यायाधीश सुदर्शन हे काँग्रेसचे उमेदवार नव्हते किंवा कोणत्याही पक्षाचे नव्हते असे सांगितले गेले. पण ते इंडिया आघाडीचे होते आणि एनडीएचे नव्हते हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ होते आणि आहे. संघाला खुश करण्यासाठी यावेळी कट्टर स्वयंसेवक असलेल्या राधाकृष्णन यांचे नाव निश्चित करण्यात आले. त्यानंतर अनेक पत्रकार त्यांच्या नावामुळे एनडीएमध्ये आता धाकधूक वाटत आहे असे बोलणे करीत होते. न्यायमूर्ती सुदर्शन यांनी संपूर्ण भारतभर आपल्याला मते देण्यासाठी प्रचार केला. त्यामध्ये त्यांनी अंतरात्म्याच्या आवाजाचेही आवाहन केले. त्यांच्या एका निकालाबद्दल गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांच्यावर ठपकाही ठेवला. त्याचा प्रतिकार करण्यासाठी इतर अनेक न्यायमूर्ती मैदानात उतरले होते. पण या विषयावर राधाकृष्णन यांनी कुठेही प्रचार केला नाही, कोणताही दौरा काढला नाही, कोणालाही मत द्या अशी विनंतीही केली नाही. त्यांच्या शांत स्वभावाप्रमाणे विचलित न होता त्यांनी संघाचा सोवळेपणा जपला, कोणालाही त्यांनी शब्दाने दुखावले नाही, मतासाठी त्यांनी कोणालाही बोलवलेही नाही, केवळ एनडीएच्या खासदारांनी त्यांना मते दिली नाहीत. तर काही इंडिया आघाडीचे खासदारही त्यांचे मतदाते झाले. एकूणच आज सामना एकतर्फी झाला. एनडीएने आता यशस्वीपणे आपला उपराष्ट्रपती बदलून दाखविलेला आहे. आता आपल्या संपूर्ण देशाचे आणि आपल्या सर्वांचे उपराष्ट्रपती राधाकृष्णन आहेत. त्यामुळे त्यांचे मनापासून अभिनंदन!


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# जन सुरक्षा विरोधात राज्यभर आक्रोश

मुंबई, दि. १० प्रतिनिधी

**महाराष्ट्र शासनाने विधानसभेत जन सुरक्षा कायदा संमत केला. मात्र त्याला अनेक राजकीय पक्षांकडून विरोध केला जात आहे. या कायद्यामुळे लोकशाहीचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न असल्याने हा कायदा रद्द करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या मागणीसाठी महाविकास आघाडीकडून राज्यव्यापी आंदोलन पुकारण्यात आले असून आज राज्यात ठिकठिकाणी आंदोलन सुरू करण्यात आले आहे.**

### मनमाडमध्ये ठाकरे गटाचे आंदोलन

राज्य शासनाकडून संमत करण्यात आलेला जन सुरक्षा कायद्याला विरोध केला जात आहे. हा कायदा रद्द करण्यात यावा; या मागणीसाठी मनमाड येथे तलाठी कार्यालयासमोर शिवसेना ठाकरे गटातर्फे निदर्शने करण्यात आले. यावेळी ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत आंदोलन करण्यात आले.

### विधेयक विरोधात कोल्हापुरात मोर्चा

जन सुरक्षा विधेयक रद्द करावं, या मागणीसाठी आज इंडिया आघाडीच्या वतीने कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. कोल्हापुरातील महावीर गार्डन इथून मोर्चा सुरू झाला असून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढण्यात आला. या मोर्चामध्ये काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांच्यासह इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे प्रमुख नेते सहभागी झाले आहेत. मोर्चानंतर इंडिया आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी अमोल एडके यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर करण्यात येणार आहे.

### संभाजी नगरात निदर्शने

जन सुरक्षा कायदा रद्द करा; या मागणीसाठी महाविकास आघाडीचे राज्यव्यापी आंदोलन पुकारण्यात आले आहे. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर शहरातील क्रांती चौकात भव्य निदर्शने करण्यात आली. जनविरोधी घटनाविरोधी लोकशाही हक्क नाकारणारा जनसुरक्षा कायदा रद्द करा; या मागणीसाठी महाविकास आघाडीचे नेते आणि कार्यकर्ते आक्रमक झाले असून सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

### मुंबईतही आंदोलन

ठाकरे गटाकडून जन सुरक्षा कायद्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात आले आहे. जनसुरक्षा कायदा रद्द करा या मागणीसाठी ठाकरेंच्या सेनेचे आंदोलन केले जात असून मुंबईत देखील शिवाजी पार्क येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ आंदोलन करण्यात आले. यावेळी ठाकरे गटाचे महत्त्वाचे पदाधिकारी आणि नेते आंदोलनाला उपस्थित आहेत. तसेच नागपूरात देखील मविआकडून आंदोलन करत विधेयकाला विरोध करण्यात आला.

जन सुरक्षा विधेयक सामान्य जनतेच्या हक्कावर गदा आणणारे असून सरकारने बहुमताच्या जोरावर सभागृहात हे विधेयक पास केले. मात्र जनतेच्या हक्कावर गदा येत असल्याने याला विरोध करण्यासाठी आज महाविकास आघाडीकडून नागपूरच्या व्हेरायटी चौकात बिल विरोधात विरोध प्रदर्शन करण्यात आलं. विशेष म्हणजे काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे कार्यकर्ते या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होतो मात्र उबाठाचे कार्यकर्ते या आंदोलनाकडे फिरकले नसल्याचं पाहायला मिळालं.






# शिवतीर्थवर ठाकरे बंधूंची भेट

## नवीन समीकरणे जुळणार?

मुंबई, दि. १० प्रतिनिधी



महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा अनपेक्षित हालचाली सुरू झाल्या आहेत. ज्या दोन भावांची राजकीय वाटा वेगळी झाली होती, तेच ठाकरे बंधू बुधवारी सकाळी पुन्हा एकत्र आले. उद्धव ठाकरे थेट दादरच्या शिवतीर्थवर दाखल झाले, आणि त्यांच्या सोबत संजय राऊत व अनिल परबही होते. या अचानक भेटीमुळे राजकारणात खळबळ उडाली आहे.


हे पहिल्यांदाच घडलंय असं नाही. याआधीही गणेशोत्सवाच्या निमित्ताने उद्धव ठाकरे शिवतीर्थवर गेले होते. त्यावेळी रश्मी ठाकरे आणि आदित्य ठाकरे सोबत होते. एवढंच नव्हे तर त्यांनी राज ठाकरे यांच्या घरी भोजनाचाही आस्वाद घेतला होता. तसेच उद्धव ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त राज ठाकरे अनेक वर्षांनी मातोश्रीवर पोहोचले होते.

याचदरम्यान काँग्रेसचे प्रमुख नेते मातोश्रीवर गेले होते. त्यावेळी मनसेला महाविकास आघाडीत सामील करण्याबाबत चर्चा झाली होती. पण काँग्रेसने 'हायकमांडच्या निर्णयावर अवलंबून' अशी सावध भूमिका घेतली. त्यामुळे आज झालेली ही भेट राजकीय दृष्ट्या अधिक महत्त्वाची मानली जातेय.

आता सगळ्यांच्या नजरा शिवसेनेच्या पारंपरिक दसरा मेळाव्याकडे लागल्या आहेत. हा मेळावा शिवाजी पार्कवर पार पडणार असून, या वेळी राज ठाकरे यांना आमंत्रण देण्याची शक्यता व्यक्त होतेय. त्यामुळे आजच्या भेटीत दसरा मेळावा आणि आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीबाबत चर्चा झाली असावी, असा अंदाज राजकीय वर्तुळात जोर धरतोय.

# नेपाळनंतर आता फ्रान्समध्येही हिंसाचार

## २०० हून अधिक जणांना अटक




पॅरिस, दि. १० वृत्तसंस्था

नेपाळमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात घडामोडी सुरू आहेत. नेपाळमधील Gen Z तरुणांचं आंदोलन संपूर्ण देशभर पसरल्यानंतर शेवटी नेपाळचे पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी राजीनामा देत देश सोडला. सध्या देखील नेपाळमध्ये मोठ्या प्रमाणात हिंसाचार सुरू असून तणावाची परिस्थिती आहे. नेपाळनंतर आता फ्रान्समध्ये देखील मोठ्या प्रमाणात हिंसाचार उफाळला असल्याची माहिती समोर आली आहे.

फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये मोठ्या प्रमाणात तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तब्बल ८०,००० पोलीस तैनात करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तसेच आतापर्यंत २०० हून अधिक जणांना जणांना अटक करण्यात आलं आहे. हजारो लोक रस्त्यावर उतरले असून सरकारच्या आर्थिक धोरणांविरुद्ध निदर्शने करण्यात येत आहेत. आंदोलक आणि पोलिसांमध्येही संघर्ष पाहायला मिळत आहे.

फ्रान्समध्ये राजकीय अस्थिरतेचं सावट अधिकच गडद झाल्याचं दिसून आलं. अवघ्या नऊ महिन्यांपूर्वी स्थापन झालेलं पंतप्रधान फ्रांस्वा बायरो यांचं सरकार सोमवारी कोसळलं. विशेष बाब म्हणजे गेल्या २० महिन्यांत चार वेगवेगळ्या नेत्यांनी फ्रान्सच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे. आता पाचव्यांदा तिथे नवीन पंतप्रधानांची नियुक्ती होण्याची शक्यता आहे.

# नेपाळमध्ये आर्मी चीफकडे सत्ता

काठमांडू, दि. १० वृत्तसंस्था

स्थिती हाताबाहेर गेल्यामुळे आता नेपाळी सैन्याने मोर्चा सांभाळला असून राजधानी काठमांडूसह अनेक संवेदनशील ठिकाणांची सुरक्षा स्वतःच्या ताब्यात घेतली आहे. सेना प्रमुख जनरल अशोक राज सिग्देल यांनी उशिरा रात्री राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात आवाहन केले की आंदोलकांनी हिंसा आणि तोडफोड थांबवून संवादाच्या मार्गावर यावे. नेपाळ मोठ्या राजकीय संकटात सापडला आहे, पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांनी राजीनामा दिला. हा निर्णय राजधानी काठमांडूसह देशभरात सुरू असलेल्या जनरेशन-झेडच्या नेतृत्वाखालील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आला. हे आंदोलन सोशल मीडियावरील बंदी आणि कथित भ्रष्टाचाराविरोधात सुरू झाले होते. बांगलादेशप्रमाणेच हे आंदोलन फारच हिंसक झाले. संसद, पंतप्रधान कार्यालय आणि इतर सरकारी इमारतींवर हल्ले करण्यात आले. राष्ट्रपती रामचंद्र पौडेल, पंतप्रधान ओली आणि माजी पंतप्रधानांच्या खाजगी घरांना आग लावण्यात आली.

# महापालिका निवडणुकीसाठी शिंदे सेनेची 'जम्बो टीम'

## २१ नेत्यांची मुख्य कार्यकारी समिती जाहीर

मुंबई, दि. १० प्रतिनिधी

आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदेसेनेच्या वतीने पक्षाची मुख्य कार्यकारी समिती तयार करण्यात आलेली आहे. यात पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्यासह २१ शिलेदारांचा समावेश करण्यात आला आहे. पुढील काही महिन्यात मुंबईसह प्रमुख महापालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू होणार आहे. त्यात पक्षाला यश मिळावे यासाठी एकनाथ शिंदे यांनी कंबर कसली आहे.

महापालिका निवडणुकीतील पक्षाच्या पातळीवरील महत्त्वाचे निर्णय या समितीच्या माध्यमातून घेण्यात येणार आहेत. शिवसेनेचे प्रमुख नेते, खासदार, माजी खासदार, आमदार, माजी आमदार यांना यात संधी देण्यात आली आहे.

मुख्य कार्यकारी समितीत, एकनाथ शिंदे, मुख्य नेते, रामदास कदम, नेते, गजानन कीर्तीकर, नेते, आनंदराव अडसूळ, नेते, मीनाताई कांबळे, नेत्या, डॉ. श्रीकांत शिंदे, रवींद्र वायकर, मिलिंद देवरा, राहुल शेवाळे, संजय निरुपम, प्रकाश सुर्वे, अशोक पाटील, मुरजी पटेल, दिलीप लांडे, तुकाराम काते, मंगेश कुडाळकर, श्रीमती मनिषा कायंदे, सदा सरवणकर, यामिनी जाधव, दीपक सावंत, शिशिर शिंदे यांचा समावेश आहे.



अलीकडेच शिंदेसेनेने मुंबईतील विविध प्रभागातील प्रभारी विभाग प्रमुख आणि प्रभारी विधानसभा प्रमुखाच्या नियुक्त्या केल्या होत्या. मुंबई महापालिकेत जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी शिंदे प्रयत्नशील आहेत. त्यात आतापर्यंत ६० हून अधिक माजी नगरसेवकांनी शिंदेसेनेत प्रवेश केला आहे. त्याशिवाय पुढील काही दिवसांत आणखी माजी नगरसेवक शिंदेसेनेत प्रवेश करतील असा दावा नेते करत आहेत. मुंबई महापालिकेवर आतापर्यंत शिवसेनेची सत्ता राहिली आहे. परंतु पक्षातील फुटीनंतर पहिल्यांदाच महापालिका निवडणुकीत दोन्ही गट आमनेसामने येणार आहेत. त्यात उद्धव ठाकरे यांना धक्का देण्यासाठी शिंदेसेना मुंबईवर विशेष लक्ष केंद्रीत करत आहे.

# दसरा मेळावा ठाकरेंचा

मुंबई, दि. १० प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मुंबईतील दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्कवर दसरा मेळाव्यासाठी मुंबई महापालिकेने परवानगी दिली आहे. दसरा मेळावा आणि शिवाजी पार्क हे जुने नाते आहे. त्यामुळे हा मेळावा शिवसेनेच्या पारंपरिक मैदानावर होणार असल्याने पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. येत्या २ ऑक्टोबर २०२५ रोजी दसरा मेळावा होणार आहे. या मेळाव्यात उद्धव ठाकरे पक्षाच्या धोरणांबाबत, विरोधकांच्या टीकेबाबत आणि महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करतील.


बीएमसीने ही परवानगी काही अटींवर दिली आहे. त्यात ध्वनिप्रदूषण नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन, स्वच्छता आणि सुरक्षेच्या नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे. पक्षाने या अटी मान्य केल्या असून आता दसरा मेळाव्याची तयारी जोरात सुरू करण्यात येणार आहे. गेल्या वर्षीही उद्धवसेनेला शिवाजी पार्कवर मेळावा घेण्याची परवानगी मिळाली होती. मात्र महापालिका निवडणुका आणि मनसेसोबत युतीच्या चर्चेमुळे यंदाच्या मेळाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवसेनेच्या इतिहासात शिवाजी पार्क मैदानाला खूप महत्त्व आहे. याच मैदानावर शिवसेनेचा पहिला मेळावा झाला होता. बाळासाहेबांच्या काळात या मैदानावर अनेक दमदार सभांचे आयोजन झाले, ज्यात त्यांच्या आक्रमक भाषणांनी लाखो कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली. बाळासाहेब ठाकरेंच्या भाषणांमुळे शिवसेनेची ओळख 'मराठी अस्मिता' आणि 'हिंदुत्व'शी याच्याशी जोडली गेली.

# अरबी समुद्रात पुन्हा कमी दाबाचा पट्टा ॲक्टिव्ह

## राज्यभरात पुढील चार दिवस वादळी पावसाचे अलर्ट

मुंबई, दि. १० प्रतिनिधी

राज्यात गेल्या महिन्याभरात पावसाने जोरदार हजेरी लावल्यानंतर सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात पावसाचा जोर काहीसा ओसरला होता. आता पुन्हा एकदा पावसाला सुरुवात झाली असून विदर्भ, मराठवाड्यासह दक्षिण मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचे इशारे देण्यात आले आहेत. पुढील तीन ते चार दिवसात राज्यभर पुन्हा एकदा पावसाला पोषक स्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाने पुढील पाच दिवसात विविध जिल्ह्यांना हाय अलर्ट दिले आहेत. आज सातारा, सांगली, सोलापूर तसेच मराठवाड्यात धाराशिव, लातूर, परभणी, हिंगोली व नांदेड जिल्ह्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. तसेच बहुतांश मराठवाड्यातही पावसाचा जोर कायम राहणार असल्याचं सांगण्यात आले आहे.



अरबी समुद्राच्या ईशान्य भागात कमी दाबाचा पट्टा सक्रिय असून तो हळूहळू पश्चिमेकडे सरकत आहे. तसेच बंगालच्या उपसागरातही पूर्व मध्यभागात पावसासाठी पोषक वातावरण तयार होत आहे. त्यामुळे आज मध्य महाराष्ट्रात तसेच मराठवाडा, विदर्भात बहुतांश ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी असेल, असे हवामान विभागाने वर्तवले आहे. यावेळी वाऱ्याचा जोर ४० ते ६० कि.मी. प्रति तास राहणार असल्याचाही सांगण्यात आले आहे.

पुढील पाचही दिवस राज्यात विविध ठिकाणी पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत. मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी पावसाचा जोर वाढेल, तर उर्वरित भागात ढगाळ वातावरणाची शक्यता आहे.

# कांदिवली आर/दक्षिण विभागात बदल्यांचा घोळ कायम

## योग्य ती कारवाई न झाल्यास सात दिवसांत उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा

गजानन तुपे

मुंबई, १०

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कांदिवली येथील आर/दक्षिण विभागात अनेक वर्षांपासून कर्मचाऱ्यांच्या बदल्या रखडल्या आहेत. वैयक्तिक हितसंबंध जपण्यासाठी वर लागेबांधे असलेली मंडळी वर्षांवर्षे त्याच जागेवर अद्याप कायम आहेत. या प्रकरणी प्रशासनाला पुन्हा एकदा कायदेशीर इशारा देण्यात आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे वकील ॲड. रोहन उत्तम कोरडे यांनी आज संबंधित अधिकाऱ्यांना आणि पालिका आयुक्तांना स्मरणपत्र (Reminder Application) सादर केले असून, येत्या सात कामकाजाच्या दिवसांत नियमानुसार बदल्या न केल्यास उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करणार असल्याचे म्हटले आहे.



यापूर्वी १३ ऑगस्ट २०२५ रोजी ॲड. कोरडे यांनी पालिकेच्या २००१ च्या परिपत्रकाचा हवाला देत कायदेशीर नोटीस बजावली होती. या परिपत्रकानुसार, प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी आणि हितसंबंध जोपासून गैरव्यवहार टाळण्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याला एकाच विभागात किंवा पदावर तीन वर्षांपेक्षा जास्त काळ ठेवता येत नाही.

### माहितीच्या अधिकारातून उघड

माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीच्या आधारे, आर/दक्षिण विभागात तब्बल ४७ कर्मचारी अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्याचे उघड झाले आहे. यादीनुसार, काही कर्मचारी १२ ते १६ वर्षांपासून एकाच विभागात ठाण मांडून आहेत, जे नियमांचे सरळसरळ उल्लंघन आहे.

### न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार

मूळ नोटिशीला १५ दिवसांची मुदत देऊनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने, ॲड. कोरडे यांनी आज हे स्मरणपत्र सादर केले आहे. "जर प्रशासन स्वतःच घालून दिलेल्या नियमांचे पालन करणार नसेल, तर नाईलाजाने आम्हाला न्यायालयाचा दरवाजा ठोठावा लागेल. येत्या सात दिवसांत बदल्यांची अंमलबजावणी न झाल्यास, प्रशासनाच्या या बेकायदेशीर निष्क्रियतेविरोधात उच्च न्यायालयात 'मँडमस' (परमादेश) याचिका दाखल केली जाईल आणि होणाऱ्या त्रासाला सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल," असे ॲड. कोरडे यांनी स्पष्ट केले. या प्रकरणामुळे पालिकेच्या कारभारातील पारदर्शकतेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. याबाबतीत एवढे सगळे चर्वितचर्वण झाल्यावर पालिका प्रशासन कोणती पावले उचलते. याकडे लक्ष लागून राहिले आहे.

## महत्त्वाचे

### ॲडव्होकेट मिलिंद चिंधडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**नाशिक ।** येथील ॲड. प्रा. मिलिंद चिंधडे यांच्या "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा गोतावळा "या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा १४ सप्टेंबर २०२५ ला रविवारी मु. शं. औरंगाबादकर सभागृह सभागृहात सायंकाळी सहा वाजता होणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्रीराम महाजन, प्रा.हेरंब गोविलकर, प्रा. डॉ.दिलीप बेलगावकर तर अध्यक्षस्थानी प्रकाश पाठक असतील. वैशाली प्रकाशन प्रकाशित या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष संपत आलेले असताना, पुस्तक प्रकाशन होत आहे, ही गोष्ट अत्यंत औचित्यपूर्ण आहे.

### सामाजिक जाणिवाच समाजाशी एकरूप होतात : माणिकराव गोडसे

**नाशिक ।** समाजात ध्येयवादी कार्य करणारी अनेक माणसं असतात. त्यांच्यामुळे समाज सुदृढ बनत असतो. मनातली प्रांजळ तळमळ




आणि जाणीव समाजाशी एकरूप होत असते, असे प्रतिपादन युवाकवी माणिकराव गोडसे यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' या उपक्रमात १८१वे पुष्प गुंफताना 'धन्यवाद' या पुस्तकावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत सावळीराम तिदमे होते. श्री.गोडसे पुढे म्हणाले की, कविता प्रत्येकाच्या जीवनात दिलासा देत असते. विविधांगी साहित्य वाचनातून आणि चिंतनातून माणसाला प्रगल्भ बनवत असते. सामाजिक बांधिलकी असलेल्या साहित्यातून जीवनाला एक आयाम प्राप्त होतो. समाजातील व्यंगावर आणि शोषणावर कोरडे ओढणाऱ्या कवितांचा या काव्यसंग्रहात समावेश आहे. नवा समाज, माणसास जाणणारा माणूस, माणुसकी सांभाळणारा असावा; असा आशावादही जागवण्याचा प्रयत्न केला आहे, असेही ते म्हणाले. संग्रहातील विविध कविता त्यांनी सादर केल्या. सुनीता वाळुंज आणि वैजयंती सिन्नरकर यांना ग्रंथभेट देण्यात आली. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले. तर अशोक कुमावत यांनी आभार मानले. दरम्यान येत्या शुक्रवारी (१२) अशोक सोनवणे 'काहुर' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

### पर्यावरण जनजागृतीसाठी नाशिकमध्ये गायनाची मैफिल

**नाशिक ।** पर्यावरण विषयक जनजागृतीसाठी नाशिकमधील प्रख्यात रिदम ग्रुप ऑफ अपरायझिंग सिंगर्स तर्फे विशेष गाण्यांची मैफिल आयोजित करण्यात आली आहे. हा




उपक्रम येत्या रविवारी, १४ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत इंदिरानगर येथील स्वर्णीमा सभागृहात पार पडणार आहे. या कार्यक्रमात निसर्ग संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करणारी गाणी सादर केली जाणार असून, परिसरातील शाळकरी विद्यार्थ्यांचे पर्यावरणविषयक प्रकल्पांचे प्रदर्शनही भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन गायन आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाची संकल्पना सारंग हुदलीकर यांची असून, प्रमोद कापडणे कार्यक्रमाचे आतिथ्य स्वीकारणार आहेत. या आयोजनात सदाशिव इंगळे, दीपक सूर्यवंशी, रोशन कुलकर्णी, सुजाता देव यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. नाशिक शहरातील नामवंत गायक कलाकार अमोल मोरे, सविता खोडके, मनीषा गवई, स्वानंद पारखी, अँथोनी सरदार, सुजाता देव, मोहिनी वानखेडे, दीपक सूर्यवंशी, सदाशिव इंगळे आणि सारंग हुदलीकर हे या मैफिलीत आपल्या सुरेल गायनातून निसर्गाशी जोडलेले जीवन आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश रसिकांपर्यंत पोहोचविणार आहेत.

### भाजपा नाशिक महानगर जिल्हा क्रीडा प्रकोष्ठ कार्यकारिणी घोषित

**नाशिक ।** भाजपा नाशिक महानगर जिल्हा क्रीडा प्रकोष्ठ कार्यकारिणी प्रकोष्ठ संयोजक दत्ता शिंदे यांनी घोषित केली. भाजपा नाशिक महानगर जिल्हा अध्यक्ष सुनिल केदार यांनी प्रसार माध्यमांना दिलेल्या पत्रकात ही माहिती दिली. भाजप प्रदेश महामंत्री विजय चौधरी, उत्तर महाराष्ट्र संघटन मंत्री रवी अनासपुरे, आ.देवायानी फरांदे, आ.राहुल ढिकले, आ.सीमा हिरे, लक्ष्मण सावजी, प्रदिप पेशकार, गोविंद बोरसे, बाळासाहेब सानप, विजय साने, महेश हिरे, सतिष कुलकर्णी, प्रशांत जाधव, गिरीष पालवे यांच्या मार्गदर्शनाने आणि भाजपा नाशिक महानगर जिल्हा सरचिटणीस सुनिल देसाई, अमित घुगे, ॲड.श्याम बडोदे, रश्मी हिरे-बेंडाळे, भाजपा नाशिक महानगर जिल्हा युवा मोर्चा शहराध्यक्ष प्रविण भाटे, महानगर मंडल अध्यक्ष, पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. नूतन कार्यकारणीत संयोजक- दत्ता शिंदे, सहसंयोजक- उत्तम उघाडे, प्रशांत जोशी. सदस्य- प्रशांत पाटील, पूर्वा घिया, बाळकृष्ण पाटील, मच्छिंद्र सोनवणे, हर्षल पवार, अवधूत कुलकर्णी, मंगेशकुमार पाटील, तन्मय आव्हाड, तेजस वानखेडे, राजेंद्र निंबाळते, अमेय भावे यांचा समावेश करण्यात आला आहे.

# कसमादे मराठा उत्कर्ष संस्थेचे 'कसमादे गौरव पुरस्कार' जाहीर

## शिक्षणमंत्री ना. दादा भुसे यांचे हस्ते होणार गौरव




**नाशिक ।** कळवण, सटाणा, मालेगाव आणि देवळा तालुक्याच्या कसमादे मराठा उत्कर्ष संस्थेच्या वतीने गेल्या वर्षी पासून चारही तालुक्यातील प्रशासकीय, वैद्यकीय, समाजसेवा, युवा, साहित्य, औद्योगिक, कला, शिक्षण, सहकार, कृषी, क्रीडा आणि विविध क्षेत्रात अभूतपूर्व कार्य करणाऱ्या व्यक्तींना "कसमादे गौरव पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात येते. यंदाच्या वर्षी देखील कसमादे भागातील १४ व्यक्तींची कार्यकारिणीने आणि समन्वय समितीने निवड केलेल्या व्यक्तींचा गौरव शनिवार दिनांक १३ रोजी दुपारी ३ वाजता मराठा विद्या प्रसारक समाजाच्या 'रावसाहेब थोरात सभागृहात' राज्याचे शिक्षण मंत्री ना. दादाजी भुसे यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष डॉ.बी.जी.वाघ, कार्याध्यक्ष प्रा.गुलाबराव भामरे, सचिव डॉ.प्रशांत सूर्यवंशी यांनी दिली.

### यांचा होणार गौरव...

लक्ष्मण किसन निकम (जीवनगौरव),नारायण परशराम कोर (विशेष योगदान पुरस्कार), डॉ.ए.के.पवार (वैद्यकीय), खंडू नानाजी मोरे (प्राथमिक शिक्षक), डॉ.जयवंत निम्बाजी ठाकरे (माध्यमिक शिक्षक), डॉ.ज्ञानेश्वर दादाजी पवार (उच्च व तंत्रशिक्षण), डॉ.विश्राम मालजी निकम(समाजसेवा), केदा दावल भामरे (कृषी), भूषण कौतिक पगार (युवा), उन्मेष शरद वाघ (प्रशासकीय), श्रीमती शकुंतला काशिनाथ भामरे (कर्तबगार महिला), डॉ.बाळासाहेब गुंजाळ (साहित्य), दुर्गा प्रमोद देवरे (क्रीडा), संजय भास्कर पवार (औद्योगिक व्यवसाय). या प्रसंगी जेष्ठ पत्रकार विश्वास देवकर यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. या सर्वांचा गौरव प्रसंगी कसमादे परिसरातील आणि शहर व जिल्ह्यातील हितचिंतकांनी उपस्थित राहावे असे आवाहन उपाध्यक्ष हिरामण सोनवणे, पंडित वाघ, रमेश खैरनार, रविंद्र निकम, सहसचिव विनीत पवार, प्रमोद अहिरराव, शिवराम हिरे, एन.डी.पवार, चंद्रशेखर सोनवणे, संजय अहिरराव, सुनील गांगुर्डे, प्रा.दिलीप अहिरे, डॉ.नंदू पवार,राजू देसले आदींनी केले आहे.

# शिवसेना-मनसेचा महायुती सरकारच्या विरोधात उद्या जनआक्रोश मोर्चा

## नागरी समस्या, खड्डे, वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचारप्रकरणी रस्त्यावर



**नाशिक ।** मराठीच्या मुद्द्यावर एकत्र आलेल्या शिवसेना (उबाठा गट) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने शुक्रवारी नाशिकमध्ये संयुक्तपणे जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. नाशिक शहरातील वाढलेली गुन्हेगारी, सर्वच रस्त्यांवर पडलेले खड्डे आणि नागरी समस्यांच्या विरोधात हा मोर्चा काढण्यात येणार असून, यानिमित्ताने प्रश्नांना वाचा फोडण्यात येणार असल्याचे दोन्ही पक्षांच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आयोजित केलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितले.

मनसेच्या राजगड येथे आयोजित पत्रकार परिषदेला मनसेचे शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, वरिष्ठ नेते दिनकर पाटील, रतनकुमार इचम, सलिम शेख, महिला आघाडीच्या सुजाता डेरे, शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख डी.जी. सुर्यवंशी, महानगरप्रमुख प्रथमेश गिते, उपनेते दत्ता गायकवाड,माजी आमदार वसंत गिते, मसूद जिलानी आदी उपस्थित होते. शहरातील विस्कळीत झालेल्या नागरी सुविधा, विविध समस्या, खड्डेयुक्त रस्ते आणि शहरात वाढलेली प्रचंड प्रमाणातील गुन्हेगारी आदी प्रश्नांवर शिवसेना उबाठा गट आणि मनसे आक्रमक झाली असून, लोकांसाठी रस्त्यावर उतरली असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी दोन्ही पक्षाच्या पदाधिकारी मंडळींनी महायुती सरकारवर टीकेची झोड उठवली. लोकांच्या प्रश्नांना मनसे आणि सेनाच वाचा फोडू शकते. त्यामुळेच दोन्ही पक्षांना लोकाश्रय मिळत असून, समाजाचे अनेक घटक दोन्ही पक्षांकडे येत असल्याचेही यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी शहरातील वाढती गुन्हेगारी अधोरेखित करीत सत्ताधारी भाजपवर निशाणा साधला. या जनआक्रोश मोर्चाला २५ हजाराहून अधिक कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी दोन्ही पक्षांनी हनीट्रॅप घोटाळा, शेतकरी वचनभंग, महापालिकेतील भ्रष्टाचार, अवैध धंदे व सावकारी, स्मार्ट मीटर आणि खासगीकरण, डिजिटल फसवणूक, महिला सुरक्षा, कामगार व तरुणांवर होणारा अन्याय, बेरोजगारी, सिंहस्थ कुंभमेळा, आदिवासी पिळवणूक, प्रशासनातील सर्वव्यापी भ्रष्टाचार, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत भ्रष्टाचार, आयटी पार्क व मोठे प्रकल्प, सत्ताधारी पक्षातील गुन्हेगारांची पाठराखण, नाशिक मनपातील पदभरती, टोलनाके आदींसह अनेक नागरी समस्या, विकासकामे, सुविधा याचा जाब विचारण्यासाठी हा जनआक्रोश मोर्चा काढला जात असल्याचे सांगितले. या मोर्चाची कल्पना दोन्ही पक्षांच्या पक्षप्रमुखांना देण्यात आली असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. नागरिकांसाठी हा मोर्चा काढण्यात येत असून, आगामी होऊ घातलेल्या निवडणुका दोन्ही पक्षांनी डोळ्यासमोर ठेवल्या नसल्याचे सांगितले. आम्ही विरोधात आहोत. त्यामुळे आमचे कामच आहे सरकारवर अंकुश ठेवण्याचे, लोकांसाठी रस्त्यावर उतरण्याचे असेही शेवटी त्यांनी सांगितले.

# ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार मदत द्या

## जनसुरक्षा विधेयकाला राष्ट्रवादी शरद पवार गटाचा विरोध




**नाशिक ।** महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टर शेती, फळबागा व भाजीपाला क्षेत्राचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर झालेले नुकसान लक्षात घेऊन राज्यात व जिल्ह्यात तात्काळ "ओला दुष्काळ" जाहीर करून सरसकट शेतकऱ्यांना हेक्टरी ५०,००० रुपये मदत करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

दरम्यान, 'महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४' हे घटनाविरोधी व लोकशाहीला बाधक असल्याचे सांगत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने या विधेयकाचा निषेध केला. सरकारने आणलेले हे विधेयक सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांना गप्प बसवणे, विरोधक व सामान्य नागरिकांची मुस्कटदाबी करण्यासाठी असल्याचा आरोप करण्यात आला. हा कायदा त्वरित रद्द करावा, अशी मागणी निदर्शनातून करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे झालेल्या या आंदोलनात नाशिक जिल्हाध्यक्ष गजानन शेलार, सरचिटणीस मुन्नाभाई अन्सारी, महिला अध्यक्ष अनिता दामले, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष संजय गालफाडे, आदिवासी विभाग जिल्हाध्यक्ष हनुमान मराठे, ओबीसी जिल्हाध्यक्ष छबू नागरे, सरचिटणीस चेतन जगताप, विभागीय अध्यक्ष (सिडको) विशाल पगार, विभागीय अध्यक्ष (मध्य) राजाभाऊ जाधव यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# जिल्ह्यात ४५ हजार नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

## 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रम

**नाशिक ।** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष व गणेश मंडळ यांच्या समन्वयातून नाशिक जिल्ह्यात गणेशोत्सवानिमित्त 'श्रीगणेशा आरोग्याचा' हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत आयोजित शिबिरात जिल्ह्यातील एकूण ४५ हजार ८७२ नागरिकांनी विविध आरोग्य सेवांचा लाभ घेतला, अशी माहिती निवासी जिल्हाधिकारी तथा मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, नाशिकचे विशेष कार्य अधिकारी रोहितकुमार राजपूत यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली.

जिल्ह्यात शहर व ग्रामीण क्षेत्रात १ हजार ९८ ठिकाणी गणेश मंडळाच्या सहाकार्यातून नाशिक महानगरपालिका, जिल्हा परिषद व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्था, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना तसेच धर्मादाय विभागाशी संलग्नीत रूग्णालयातील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नातून नागरिकांची मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात आली. आयोजित शिबिरांत स्टेमी योजनेंतर्गत ECG तपासणी व हिंद लॅब मार्फत विविध तपासण्या मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. जिल्ह्यात १ हजार ९८ ठिकाणी देण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी सेवांमध्ये एकूण ४५ हजार ८७२ रूग्णांपैकी १५ हजार २५ स्त्रिया, १३ हजार ८७१ पुरूष, ९ हजार ३६७ मुले व ५ हजार ९६८ मुलींची प्राथमिक तपासणी करण्यात आली. यापैकी गरज असलेल्या २ हजार २०३ रूग्णांचे ECG स्टेमी योजनेंतर्गत करण्यात आले. यापैकी ७ हजार ९५२ गरजू रूग्णांची HLL मार्फत रक्त तपासणी करण्यात आली. यापैकी ९८९ रूग्णांना पुढील आवश्यक तपासणी व उपचारार्थ संदर्भ सेवा देण्यात आली असून विविध शासकीय योजनांद्वारे उपचार करण्यासाठी पाठपुरवा केला जाणार असल्याचे राजपूत यांनी कळविले आहे.

# विमुक्त दिन दिला पण घटनात्मक हक्क द्यावे : मुनशेट्टीवार

**नाशिक ।** भटके जाते व विमुक्त जातींना जन्मताच ब्रिटिश सरकारने गुन्हेगारी जमात म्हणून कायदा केला व त्यांच्या स्वतंत्र वसाहती करून तारेच्या कुंपणांनी बंदिस्त केले होते. भारत स्वतंत्र झाल्यावर १९५२ मध्ये भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी तो गुन्हेगारी कायदा रद्द करून दिनांक ३१ ऑगस्ट १९५२ ला तारेचे कंपाउंड तोडून मुक्त केले. तेव्हापासून भटक्या विमुक्त जाती जमातीने ३१ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करीत होते.



महाराष्ट्र शासनाने दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ ला शासन निर्णय काढून "३१ ऑगस्ट" हा दिवस "भटके विमुक्त दिवस" म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतल्याने हा दिवस नाशिक येथे पाथर्डी फाट्या जवळील "कडकलक्ष्मी" समाजाच्या वस्तीत हा दिवस मोठ्या उत्साहाने संपन्न करण्यात आला. प्रारंभी मराई माँ देवीचे पूजन तदनंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मुक्तेश्वर मुनशेट्टीवार यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले व प्रमुख पाहुणे म्हणून सर्वप्रथम महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केले व भटक्या विमुक्तांना शिक्षणाच्या प्रवाहात मुला मुलींना आणून त्यांचे भवितव्य घडवावे. पारंपारिक व्यवसाय राहणार नाही. केंद्र सरकारने या जाती जमातीला घटनात्मक हक्क देवून निवारा, शिक्षण, आरोग्य व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्यावे असे मनोगतात भावना व्यक्त केले.

भटक्या विमुक्त संघटनेचे नेते बापू शिंदे यांनी प्रास्ताविक केले. तर मांगुलाल जाधव, लक्ष्मण धोत्रे, सोमनाथ मोहिते, रतन सांगळे, सुनील चव्हाण, बाळासाहेब नलावडे, कृष्णा जाधव, अलका जाधव, सुरेखा गायकवाड, अंजना जाधव आदींनी सहभाग घेऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. शेवटी पारंपारिक कार्यक्रमाने कार्यक्रमाची सांगता झाली. वस्तीतील लहान मुला मुलींना बिस्किटाचे वाटप करण्यात आले.

# पावसाची दोन दिवसांपासून विश्रांती...

**नाशिक ।** गणेशोत्सवात नियमितपणे हजेरी लावणाऱ्या पावसाने दोन दिवसांपासून विश्रांती घेतली असून प्रथमच सूर्यदर्शन झाले. श्री गणरायाचे आगमनालाही पाऊस बसरला. गणेशोत्सवाच्या काळात एक-दोन दिवसांचा अपवाद वगळता पाऊस नित्यनेमाने पडतच होता. दरम्यानच्या काळात सुर्यदर्शनही होऊ शकले नव्हते. धरणक्षेत्रात पाऊस जोरदार बसरल्याने चौदा धरणे शंभर टक्के भरली असून पाण्याचा विसर्ग करण्यात येत होता. गणरायाला जलाभिषेक करून निरोप दिल्यानंतर पावसाने विश्रांती घेतल्याचे दिसून येत आहे. अधूनमधून ढगाळ वातावरण असले तरी अनेक दिवसांनंतर सुर्यदर्शन झाले. पावसाच्या सततच्या हजेरीमुळे विस्कळीत झालेले जनजीवनही पूर्वपदावर आले.

# डॉ. ए. बा. ब्राह्मणकर म्हणजे समाज घडविणारा शिक्षण तपस्वी : प्रा. टी. बी. साळुंखे

**नाशिक ।** डॉ. ए. बा. ब्राह्मणकर म्हणजे ज्ञानावर, मूल्यांवर आणि मार्गदर्शनावर भर देऊन समाज घडविणारा शिक्षणतपस्वी आहे. शिक्षक हे आपले दुसरे पालक असतात, जे केवळ शिक्षणच देत नाहीत, तर जीवनात मूल्ये आणि योग्य मार्गदर्शनही करतात. डॉ. ब्राह्मणकर फक्त प्राचार्यच नव्हे, तर पालक म्हणूनच सेवक व विद्यार्थ्यांना वाटत असे. म्हणूनच अशा शिक्षण तपस्वीपुढे समाजाने नतमस्तक झाले पाहिजे, असे मत ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ प्रा. टी. बी. साळुंखे यांनी व्यक्त केले

डॉ. ब्राह्मणकर यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी झालेल्या छोट्याशा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शारीरिक क्रीडा संचालक प्रा. बी. के. थोरात, प्रा. माणिकराव गायकवाड, दैनिक 'महासागर'चे संपादक प्रा. जयंत महाजन उपस्थित होते. समाजाच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असते. विद्यार्थी, समाज आणि देशाच्या प्रगतीसाठी त्यांचे अथक प्रयत्न कौतुकास्पद असतात. डॉ. ब्राह्मणकर सरांनी शिक्षण क्षेत्रातच स्वतःला झोकून दिल्यामुळे समाज घडत गेला. शिक्षकही घडला व विद्यार्थीही उद्दिष्टांपर्यंत जाऊन पोहोचला. ज्ञान आणि मूल्यांच्या प्रकाशात आयुष्य उजळणाऱ्या आपल्या शिक्षकांचे आभारच मानावे लागेल, असे मत प्रा. थोरात यांनी व्यक्त केले.



प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात शिक्षकाची भूमिका ही दुसऱ्या पालकासारखी असते. ते आपल्याला घडवतात, प्रेरणा देतात आणि योग्य मार्गावर चालण्यास मदत करतात. डॉ ब्राह्मणकर हे त्याच पिढीतील आदर्श शिक्षक ठरले. ते केवळ शिक्षक नाही, तर आमचे मार्गदर्शक, मित्र आणि प्रेरणास्थान ठरले. त्यांच्यामुळेच आम्ही जीवनातील आव्हानांना सामोरे जायला शिकलो, असे मत प्रा. महाजन यांनी व्यक्त केले. शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेला त्याग आणि समर्पणाचा सन्मान करण्यासाठी दिवसभर शिक्षण क्षेत्रासह विविध उच्चपदस्थांनी त्यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या व त्यांचे आशीर्वादघेतले.

# नाशिकला नव्या उंचीवर नेण्यासाठी सीपीआरआय लॅब महत्वाची : ना. भुजबळ






**नाशिक ।** नाशिकच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी शिलापूर येथे उभारण्यात आलेल्या सीपीआरआय लॅबमुळे नाशिकमध्ये हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन रोजगार निर्मिती होणार आहे. त्यामुळे नाशिकच्या औद्योगिक क्षेत्राला नवीन उंची प्राप्त होऊन नाशिक हे लवकरच इलेक्ट्रिक हब म्हणून विकसित होईल असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

मंत्री छगन भुजबळ व माजी खासदार समीर भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून शिलापूर येथे साकारण्यात आलेल्या सेंट्रल पॉवर रिसर्च इन्स्टिट्युटच्या प्रादेशिक प्रयोगशाळेचे केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहरलाल खट्टर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री गिरीश महाजन, मंत्री दादाजी भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खा. राजाभाऊ वाजे, आ. अॅड.राहुल ढिकले, आ. डॉ.राहुल आहेर, आ. प्रा.देवयानी फरांदे, आ. सरोज आहिरे, सीपीआरचे महासंचालक असित सिंग, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, मनपा आयुक्त मनिषा खत्री यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी भुजबळ म्हणाले की, सीपीआरआय ही केवळ एक प्रयोगशाळा नाही, तर ती विद्युत सुरक्षेची, संशोधनाची आणि उद्योगविश्वाला दिशा देणारी एक महत्वाची संस्था आहे. विद्युत उपकरणे, ट्रान्सफॉर्मर्स, केबल्स, स्विचगिअर्स यांची आंतरराष्ट्रीय दर्जानुसार चाचणी करण्याचे केंद्र म्हणजे सीपीआरआय आहे. जगभरात विद्युत उपकरणांची मागणी प्रचंड वाढत असताना, त्यांच्या गुणवत्तेची खात्री मिळवून देणे ही मोठी जबाबदारी आहे. ही जबाबदारी आता आपल्या नाशिकनेही पेलण्यास सुरुवात केली असून नाशिकमध्ये उद्योगवाढीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अधिक प्रयत्न करत आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानले.

## स्थानिक हजारो युवकांना रोजगाराच्या संधी

इलेक्ट्रीक टेस्टिंग लॅब प्रकल्प नाशिकमधील विद्युत अभियांत्रिकी क्षेत्राला कलाटणी देणारा असा प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे नाशिकच्या उद्योजकांना मोठा फायदा मिळणार असून रोजगाराची मोठी संधी देखील मिळणार आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील तसेच पश्चिम भारतातील कंपन्यांना जागतिक स्तरावर दर्जेदार चाचण्या मिळतील. निर्यात वाढीस चालना मिळेल. तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांना बळकटी मिळणार आहे. स्थानिक पातळीवर हजारो युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. देश- विदेशांतर्गत विद्युत उपकरणे वापरासाठी चाचणी परीक्षण आवश्यक असते. त्याची सुविधा स्थानिक ठिकाणी होणार असल्याने नाशिकचे नाव आंतरराष्ट्रीय विद्युत बाजारपेठेच्या नकाशावर जाण्यास मदत होणार आहे. नाशिकमधील लहान व मोठ्या विद्युत उपकरणांचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यांचे विस्तारीकरण येथे होण्यास मदत होईल. इटली, कॅनडा, ब्राझील, इराण, हॉलंड अशा अनेक देशांच्या चाचणी सुविधादेखील सीपीआरआयप्रमाणेच असल्याने स्थानिक उद्योगांना थेट उत्पादनांचा पुरवठा या देशात करणे शक्य होणार आहे. ही लॅब नाशिकला औद्योगिकदृष्ट्या नवे उंचीवर नेईल.

# विंचूरमधील रेशन धान्य काळ्या बाजारात; मालेगावचा माफिया कोट्यधीश!









**नाशिक ।** निफाड तालुक्यातील विंचूर परिसरात रेशन धान्याचा काळाबाजार दिवसेंदिवस फोफावत असून यातून महिन्याकाठी कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. गोरगरिबांच्या तोंडचा घास हिसकावून राजकीय वरदहस्ताने आणि काही अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने चालणाऱ्या या टोळीचा दबदबा इतका वाढला आहे की प्रशासनही गप्प बसल्याचे दिसून येत आहे.

मालेगावचा मूळ रहिवासी असलेला आणि विंचूर हे मामाचे गाव असलेल्या या रेशन माफियाने अवघ्या पाच वर्षांत अफाट संपत्ती कमावली. काही वर्षांपूर्वी बाजारात पायली-पायली धान्य गोळा करणारा हा माफिया आज कोट्यवधींचा डीलर झाल्याचे पाहून नागरिक अवाक झाले आहेत. स्थानिक पोलिसांनी काही वर्षांपूर्वी या माफियाच्या गोडाऊनवर छापा टाकला होता. सॅम्पल ताब्यात घेतले गेले, मात्र त्यानंतर कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. उलट पोलिस यंत्रणेच्या निष्क्रियतेमुळे रेशन माफियांचे धाडस आणखी वाढले. उमराणे येथील व्यापारी देवरे याची त्याला साथ लाभल्याचेही समोर आले आहे.

विंचूरपासून अवघ्या एक किमी अंतरावर, विष्णुनगरमधील देवकी लॉन्सजवळ असलेले गोडाऊन हे या काळाबाजाराचे प्रमुख ठिकाण ठरले आहे. इथूनच गावोगाव, तालुक्यात आणि बाहेर मोठ्या प्रमाणावर तांदूळ व गहू काळ्या बाजारात पाठवला जातो. एवढेच नव्हे तर तांदूळ उमराणा मार्गे गुजरातमधील राईस मिलमध्ये पोहोचतो. तिथे पॉलिशिंग करून तोच तांदूळ दुप्पट भावाने बाजारात विकला जातो. या टोळीच्या मागे काही स्थानिक नेत्यांचे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आशीर्वाद असल्याची चर्चा आहे. त्यामुळे पुरवठा विभाग पूर्णपणे निद्रिस्त अवस्थेत असल्याचे दिसूनयेत आहे. विंचूर व लासलगाव परिसरातील नागरिकांमध्ये या बाबत प्रचंड नाराजी असून गोरगरिबांसाठी असलेले धान्य खुलेपणाने काळ्या बाजारात विकले जात असताना प्रशासन डोळेझाक करते आहे.या रेशन माफियांच्या मुसक्या आवळण्यासाठी आणि विंचूरमधील काळा बाजार थांबवण्यासाठी नागरिकांकडून धान्य पुरवठा अधिकाऱ्यांनी तातडीने कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

**रेशनच्या धान्याची काळाबाजारी याबाबत कुठलीही तक्रार असल्यास पुढील नंबरवर संपर्क साधावा. मो. ८६०५३८४९२५**

## ➤ महत्त्वाचे

### कुंभमेळा तयारी आढाव्यासाठी प्रांतधिकाऱ्यांच्या आखाड्यांना भेटी

**नाशिक ।** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी प्रांत अधिकारी प्रणव दत्ता यांनी आज त्र्यंबकेश्वर येथील विविध आखाड्यांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी आखाडा प्रमुखांकडून कुंभमेळ्याच्या नियोजनाची माहिती घेतली. भाविकांना सोयीस्कर होईल, अशा पद्धतीने कुंभमेळ्याचे नियोजन करण्याची मागणी श्री पंचायती महानिर्वाणी आखाड्याचे राष्ट्रीय सचिव श्रीमंहत रमेश गिरी महाराज यांनी प्रांत अधिकाऱ्यांकडे केली. अमृत स्नानासाठी येणारे भाविक, साधू-संतांची संख्या, त्यांची मिरवणूक व मार्ग तसेच यासंबंधीचे नियोजन याबाबतची माहिती प्रांत अधिकाऱ्यांनी जाणून घेतली. त्यांनी श्री पंचायती महानिर्वाणी आखाड्याला भेट दिली असता रमेश गिरी महाराजांनी त्यांना विजयाचा आशीर्वाद दिला. यावेळी महाराजांनी त्यांना आखाड्याचे इष्टदेवता कपिल महामुनी यांच्या जयंती उत्सवाचे आमंत्रणही दिले. प्रांत अधिकारी प्रणव दत्ता यांनी केवळ महानिर्वाणी आखाड्यालाच नव्हे, तर इतरही आखाड्यांना भेट देऊन त्यांच्याकडून नियोजनाची माहिती घेतली. भेटीदरम्यान, नगर पालिकेचे मुख्याधिकारी श्रीयादेव देवचक्के, तहसीलदार संचेती, इतर सहकारी उपस्थित होते. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्रशासनाने नियोजन सुरू केले असून, भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### मंत्रीमंडळाच्या बैठकीत कांदा प्रश्नावर चर्चा

**नाशिक ।** सध्या कांद्याचे भाव उतरलेले असताना नाफेडने कांदा बाजारात आणल्यामुळे कांद्याचे भाव आणखी पडले आहेत. कांद्याला सरासरी १४०० ते १५०० रुपये भाव असताना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (नाफेड) आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (एनसीसीएफ) यांनी बफर स्टॉकचा कांदा बाजारात आणल्यामुळे कांद्याचे भाव घसरल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याकडे मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्रिमंडळ बैठकीचे लक्ष वेधले. या संदर्भात बैठकीत भुजबळ म्हणाले, शेतकऱ्यांच्या कांद्याला दर मिळत नसताना दुसरीकडे केंद्र सरकारने नाफेडच्या माध्यमातून आता सवलतीच्या दरात कांदा विक्री सुरू केली आहे. या निर्णयामुळे ग्राहकांना फायदा होणार असला तरी शेतकऱ्यांना मात्र मोठा फटका बसणार आहे. राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (नाफेड) आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (एनसीसीएफ) केंद्रीय भांडार यांच्या माध्यमातून ज्या शहरांत कांद्याचे दर ३० रुपये किलोपेक्षा जास्त आहेत, त्या शहरांमध्ये २४ रुपये किलो दराने कांदा विकला जाणार आहे. डिसेंबरपर्यंत ही विक्री प्रक्रिया सुरू राहणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार असल्याचे भुजबळ यांनी म्हटले आहे.

# धक्कादायक : दर्शनासाठी आलेल्या भाविक महिलेचे हॉटेलमध्ये लपून व्हिडिओ शूट

## धार्मिक नगरीत महिला सुरक्षेला धोका; महिला आयोगाच्या हस्तक्षेपाची मागणी

**त्र्यंबक ।** धार्मिक नगरीत भाविकांच्या सुरक्षेला तडा जाईल, असा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्र्यंबकेश्वर मंदिरासमोरील साईप्रसाद भोजनालयात नैसर्गिक विधी करण्यासाठी गेलेल्या महिलेचे लपून मोबाईलमध्ये चित्रीकरण करण्यात आल्याची गंभीर घटना घडली. या प्रकरणी हॉटेलमधील एका अल्पवयीन कामगाराविरुद्ध त्र्यंबक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाहेरगावाहून दर्शनासाठी आलेल्या काही भाविकांनी संबंधित भोजनालयात जेवण केले. त्या वेळी महिलांनी हॉटेलमधील बाथरूमचा वापर केला असता, अल्पवयीन कामगाराने लपून मोबाईलमधून महिलेचे चित्रीकरण केले. हा प्रकार महिलेच्या लक्षात आल्यानंतर तिने थेट त्र्यंबक पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल




करत आरोपी अल्पवयीनावर विनयभंगासह संबंधित कलमान्वये कारवाई सुरू केली आहे.

या घटनेनंतर त्र्यंबक शहरात संतापाची लाट उसळली आहे. धार्मिक नगरीत



दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये, विशेषतः महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. स्थानिक पातळीवर महिला व सामाजिक संघटनांनी हॉटेल चालक व कामगारांची कसून चौकशी करावी, अशी मागणी केली असून केवळ आरोपीवरच नव्हे तर भोजनालय चालकावरदेखील कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. या गंभीर प्रकारामुळे त्र्यंबक परिसरातील हॉटेल्स व भोजनालयांची विश्वासार्हता धोक्यात आली असून, सर्वच हॉटेल्समध्ये लेडीज बाथरूमची तपासणी व सुरक्षा उपाययोजना काटेकोरपणे कराव्यात अशी मागणी होत आहे. या प्रकरणी महिला आयोगानेही दखल घ्यावी, असा सूर जोर धरू लागला आहे. धार्मिक स्थळ म्हणून देशभरातून लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. अशा ठिकाणी घडलेली ही घटना शहराच्या प्रतिमेला तडा देणारी असून, पोलीस याप्रकरणी पुढे कोणती कडक कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणी हॉटेल मालक यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही.

# विधीसंघर्षित बालक, चुलत्याचा कारनामा उघड

## उपनगर पोलिसांची धडक कारवाई, ९ मोटारसायकली जप्त




**नाशिक ।** शहरातील मोटारसायकल चोरी व चैन स्नॅचिंगच्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी सर्वच पोलीस ठाण्यांना विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्यानंतर उपनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने मोठी कामगिरी केली आहे. या कारवाईत विधीसंघर्षित बालकासह त्याचा चुलता सलीम हुसेन पठाण यांचा मोटारसायकल चोरीचा कारनामा उघड झाला असून तब्बल नऊ मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. दि. ३ सप्टेंबर रोजी दाखल झालेल्या गुन्हा रजि. नं. ३८१/२०२५ च्या तपासादरम्यान पोहवा संदीप पवार यांना पो.अ. जयंत शिंदे यांच्याकडून गोपनीय माहिती मिळाली. वडनेर परिसरात चोरीस गेलेली मोटारसायकल असल्याचे कळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयंत शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचून संशयिताला जेरबंद केले. चौकशीदरम्यान तो विधीसंघर्षित बालक असल्याचे समोर आले. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे त्याचा चुलता सलीम हुसेन पठाण (रा. गोंदे, ता. इगतपुरी) याचाही सहभाग उघड झाला. सदर बालकाने याआधीही चुलत्यासह नाशिक शहर व ग्रामीण परिसरातून मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्या सांगण्यावरून तपास वाढविला असता एकूण नऊ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. यामध्ये , विविध मॉडेलच्या गाड्यांचा समावेश असून त्यांची एकूण किंमत रु. ३ लाख ५ हजार इतकी आहे. या सर्व मोटारसायकली उपनगर, नाशिकरोड, इंदिरानगर, मुंबईनाका, घोटी आणि इगतपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरी झालेल्या आहेत. सध्या विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले असून त्याचा चुलता सलीम पठाण फरार आहे. त्याचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, उप आयुक्त (परिमंडळ-२) किशोर काळे आणि सहायक पोलिस आयुक्त (नाशिक रोड विभाग) डॉ. सचिन बारी यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि. जयंत शिरसाठ, पोनि. संजीव फुलपगारे (गुन्हे), पोउनि. प्रभाकर सोनवणे, पोहवा संदीप पवार, पो.अ. जयंत शिंदे व गुन्हे शोध पथकातील अन्य अधिकारी-कर्मचारी यांनी केली. पुढील तपास पोहवा संदीप पवार करत आहेत.

# कोयत्याने जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणारा सराईत गुन्हेगार गुंडाविरोधी पथकाच्या सापळ्यात

**नाशिक ।** देवळाली कॅम्प परिसरातील बुखारी हॉटेलजवळील मोना हिच्या टपरीवर फिर्यादी आदित्य उत्तम भालेराव व त्याचा मित्र उभे असताना आरोपी प्रेम गोपाल थोरात (रा. हाडोळा, आनंद रोड, देवळाली कॅम्प) व त्याचा साथीदार यांनी जुन्या वादातून कुरघोडी करत दोघांवर कोयत्याने डोक्यावर व हातावर वार करून गंभीर दुखापत केली होती. या प्रकरणी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ९४/२०२५, भा. दं. सं. कलम १०९, ११५(२), ३५२, ३५१(२) सह मपोकाक १३५/३७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, आरोपी प्रेम थोरात हा गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होता.



गंभीर स्वरूपाच्या या प्रकरणाकडे पोलिस आयुक्त संदीप कर्णीक, उपआयुक्त (गुन्हे) किरणकुमार चव्हाण व सहा. पोलिस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांनी विशेष लक्ष घालून गुंडाविरोधी पथकाला आरोपीला तातडीने अटक करण्याचे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने गुंडाविरोधी पथकाचे अंमलदार अक्षय गांगुर्डे यांना गुप्त माहिती मिळाली की फरार आरोपी प्रेम थोरात हा तपोवन परिसरात दिसून येणार आहे. प्रभारी अधिकारी सपोनि ज्ञानेश्वर मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तपोवन व आडगाव परिसरात सापळा रचला. आज दुपारी सुमारे २ वाजेच्या सुमारास कपिला संगम परिसरातून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. अटक केलेला आरोपी प्रेम गोपाल थोरात (वय २० वर्षे) यास पुढील कायदेशीर कारवाईसाठी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. या यशस्वी कारवाईत सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते, पोलीस अंमलदार मलंग गुंजाळ, विजय सुर्यवंशी, सुनिल आडके, प्रदीप ठाकरे, अक्षय गांगुर्डे, गणेश भागवत, राजेश राठोड, कल्पेश जाधव, दयानंद सोनवणे, घनश्याम महाले व सुनिता कवडे यांनी सहभाग नोंदवला.

# ना लीडर, ना चेहरा..
## नेपाळी जेन झेड का भडकले?

नेपाळमध्ये सोशल मीडियावरील बंदी आणि सरकारी भ्रष्टाचारावरून तरुण रस्त्यावर उतरले. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनीही यात भाग घेतला. सुरुवातीला त्यांची संख्या सुमारे १५ ते २० हजार होती. लवकरच ती ४०-५० हजारांवर पोहोचली. निदर्शक संसदेत प्रवेश करू लागले तेव्हा पोलिसांनी गोळीबार केला. या दरम्यान सुमारे २० लोक मृत्युमुखी पडले आणि २०० हून अधिक लोक जखमी झाले. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी पाण्याच्या तोफांचा वापरही केला. गर्दी नियंत्रित करण्यासाठी लष्करालाही पाचारण करावे लागले. या निषेधात कोणताही नेता नव्हता किंवा कोणताही मोठा चेहरा नव्हता. तरीही नेपाळच्या इतिहासात निदर्शकांनी संसदेत घुसून तोडफोड केली आणि आग लावली. काठमांडू प्रशासनाने तोडफोड करणाऱ्यांना दिसताच गोळ्या घालण्याचे आदेश दिले. नेपाळमध्ये हे आंदोलन कसे सुरू झाले? एवढी मोठी गर्दी कशी जमली? यामागे कोणी चेहरा किंवा नेता आहे का?

--------------

८ सप्टेंबर रोजी नेपाळमध्ये झालेल्या निदर्शनात सहभागी झालेले बहुतेक लोक विद्यार्थी होते. त्यापैकी काही जण शाळेच्या गणवेशात आले होते. सुरुवातीला निदर्शने शांततेत सुरू होती. अचानक निदर्शक संसदेच्या आवारात घुसू लागले. त्यांना हाकलून लावण्यासाठी पोलिसांनी गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. 'इतके लोक जखमी झाले होते की रुग्णालयातील सर्व बेड भरले होते. जखमींना जमिनीवर पडून मलमपट्टी केली जात होती. कर्मचारी खूप कमी होते आणि खूप ताणतणावात होते.

काठमांडूमध्ये विद्यार्थ्यांवर गोळीबार केल्याचा एक व्हिडिओही समोर आला आहे. यामध्ये काही तरुणांनी जखमी विद्यार्थ्याला मदत करण्यासाठी रुग्णवाहिका थांबवली. ते विद्यार्थ्याला आत घेऊन जात असताना पोलिसांनी वरून त्यांना लक्ष्य केले आणि त्यांच्यावर गोळीबार केला. ज्यामध्ये एका तरुणाचा मृत्यू झाला.

गेल्या काही दिवसांत नेपाळमधील या आंदोलनाबाबत सोशल मीडियावरील पोस्ट तपासल्या असता नेपाळमधील या आंदोलनाचे पैलू समजले. हे आंदोलन अचानक झाले नाही तर ते शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून परवानगी घेण्यात आली होती. नंतर ते हिंसक झाले.

या चळवळीचा पाया फेसबुक आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर स्टॉप करप्शन, जेनझेड नेपाळ आणि वेक अप नेपाळ या हॅशटॅग्जचा वापर करून घातला गेला. काठमांडूचे महापौर आणि रॅपर बालेन शाह यांच्या फेसबुक पोस्टने जास्तीत जास्त तरुणांपर्यंत हे अभियान पोहोचवण्यात भूमिका बजावली.

बालेन शाह यांनी ७ सप्टेंबर रोजी एक पोस्ट पोस्ट केली होती. ज्यामध्ये त्यांनी लिहिले होते, ८ सप्टेंबरची रॅली स्पष्टपणे जेन झेडची आहे. मी २८ वर्षांपेक्षा कमी वयाचा आहे पण आता मी त्यांच्या तुलनेत म्हातारा दिसतो. मला त्यांच्या इच्छा, हेतू आणि विचार समजून घ्यायचे आहेत. कोणत्याही पक्षाने, नेत्याने, कार्यकर्त्याने किंवा खासदाराने त्यांच्या वैयक्तिक फायद्यासाठी उद्याच्या रॅलीत सामील होऊ नये.

ही पोस्ट २१ हजारांहून अधिक वेळा शेअर करण्यात आली. ३.५ लाखांहून अधिक वापरकर्त्यांनी त्यावर प्रतिक्रिया दिल्या. ३६ हजारांहून अधिक वापरकर्त्यांनी त्यावर कमेंट केल्या. सर्व कमेंटमध्ये, अधिकाधिक लोकांना निषेधासाठी बोलावण्याचे म्हटले होते.

नेपाळमधील चळवळीची ही एकमेव सर्वाधिक व्हायरल सोशल मीडिया पोस्ट होती, ज्यावर तरुणांनी खूप प्रतिक्रिया दिल्या आणि ती व्हायरल केली.

या चळवळीबद्दल आणखी एक सोशल मीडिया पोस्ट आहे, जी नेपाळी तरुणाने खूप व्हायरल केली. या पोस्टमध्ये लिहिले आहे, ही आपल्या सर्वांची चळवळ आहे. येथे कोणालाही नेता बनवले जात नाही आणि कोणीही नेता बनण्याचा प्रयत्नही करू नये. सर्व तरुण नेते आहेत. संधीच्या शोधात कोणीही स्वतःला पुढे आणण्याचा प्रयत्न करू नये.

कोणताही अभिनेता, प्रसिद्ध व्यक्तिमत्व, नेता इथे येऊ नये. जर तुम्हाला खरोखरच पाठिंबा द्यायचा असेल तर तरुणांसोबत उभे राहा. हे कोणासाठीही प्रचाराचे व्यासपीठ नाही. हे आंदोलन आपल्या भविष्यासाठी, आपल्या आवाजासाठी, आपल्या सन्मानासाठी आणि अभिमानासाठी आहे. हिंसाचार नाही, द्वेष नाही, फक्त शांततेने आवाज उठवत आहे.

नेपाळमधील या चळवळीबाबत लोकांना एकत्र करण्यासाठी ही सोशल मीडिया पोस्ट देखील व्हायरल झाली. ही चळवळ अतिशय शांततेने सुरू झाली, ज्यामध्ये फक्त तरुणांसाठीच जागा होती. ती सोशल मीडिया बंदी, सरकारी भ्रष्टाचार आणि नेपो बेबीजच्या विरोधात होती. नेपो बेबीज म्हणजे घराणेशाही किंवा घराणेशाहीचे बळी. उदाहरणार्थ, तरुणांचा असा विश्वास आहे की करिअरमध्ये यश घराणेशाहीमुळे मिळू नये तर त्याच्या गुणवत्तेनुसार मिळावे.








निदर्शक अधिक सक्रिय झाले. हे आंदोलन इतके हिंसक होईल असे कोणीही विचार केला नव्हता. सरकारलाही याची कल्पना नव्हती. सरकार यामध्ये पूर्णपणे अपयशी ठरले. निदर्शकांनी संसदेत प्रवेश कधी सुरू केला हे पोलिस आणि स्थानिक प्रशासनालाही समजले नाही.'

'जेव्हा पोलिसांना कळले की जमाव नियंत्रणाबाहेर जात आहे, तेव्हा सैन्याला पाचारण करण्यात आले. तथापि, सुरुवातीला निदर्शक सैन्यासमोर झोपले, ज्यामुळे त्यांना पुढे जाणे कठीण झाले. जेव्हा काही निदर्शकांनी संसदेभोवती आग लावली आणि दगडफेक करून तोडफोड सुरू केली, तेव्हा त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला.'

नेपाळचे ज्येष्ठ पत्रकार नरेश ग्यावली म्हणतात, '८ सप्टेंबर रोजी झालेल्या हिंसक आंदोलनामागे दोन प्रमुख कारणे आहेत. हे आंदोलन अवघ्या दोन दिवसांत पूर्ण झाले. यामागील तात्काळ कारण म्हणजे सोशल मीडियावरील बंदी. कारण बंदीमुळे तरुण खूप संतप्त होते.'

फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सअ‍ॅपसह अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसाठी काही नियम आणि कायदे बनवण्यात आले आहेत. ज्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी न केल्याने ४ सप्टेंबर रोजी २६ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बंदी घालण्यात आली. यामुळे तरुणांमध्ये संताप निर्माण झाला.

'या आंदोलनामागील दुसरे मोठे कारण म्हणजे भ्रष्टाचार. देशात स्थापन झालेल्या नवीन सरकारमध्ये अनेक जुने राजकारणी आहेत. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करणाऱ्या तरुणांमध्ये खूप संताप आहे. ते या विरोधात निषेध करत आहेत. या आंदोलनाचा कोणी नेता नाही, ना कोणी नेता आहे.'

'ही एक चळवळ आहे जी सोशल मीडियाद्वारे नियोजित आहे. तरुणांनी सोशल मीडियाद्वारेही याचा प्रचार केला. जेव्हा त्यावर बंदी घालण्यात आली तेव्हा त्यांनी श्ढठ चा वापर केला. त्यानंतर ही चळवळ इतकी मोठी झाली. ज्यामध्ये १५ ते २० हजार तरुण रस्त्यावर उतरले.'

सत्ताधारी कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळचे खासदार आणि पंतप्रधान केपी शर्मा ओली यांचे जवळचे मंगल प्रसाद गुप्ता म्हणतात, 'सोशल मीडियावरील बंदीविरोधात संसद भवन संकुलासमोर १० हजारांहून अधिक तरुण निदर्शने करत होते. त्यानंतर अचानक संसदेच्या पश्चिमेकडील प्रवेशद्वाराजवळ निदर्शकांची गर्दी जमू लागली. काही वेळाने हे लोक सभागृहाला घेरले आणि आत घुसले.'

'पोलिसांनी संपूर्ण निषेध संयमी आणि व्यावसायिक पद्धतीने नियंत्रित केला. जर सरकारने कडकपणा दाखवला नसता तर संसद भवन आणि परिसरातील प्रमुख इमारतींचे नुकसान झाले असते. या निषेधानंतर शेर बहादूर देउबा आणि केपी शर्मा ओली यांच्या नेतृत्वाखाली एक उच्चस्तरीय बैठक झाली. सरकार काही व्यासपीठ मर्यादित आणि नियंत्रित पद्धतीने पुन्हा सुरू करण्याचा विचार करत आहे, परंतु त्यापूर्वी त्यांना नोंदणी करावी लागेल.'

'परिस्थिती सामान्य होईपर्यंत राजधानी काठमांडूसह सर्व प्रमुख भागात सैन्य आणि नेपाळ पोलिसांची तैनाती कायम राहील. अनेक तणावपूर्ण भागात कर्फ्यू सुरूच आहे.' सरकारच्या निर्णयावर लोक नाराज आहेत, जेव्हा त्यांनी आवाज उठवला तेव्हा त्यांना गोळ्या घातल्या गेल्या.

नेपाळमधील सर्वात मोठ्या विरोधी पक्ष कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ-माओइस्ट सेंटर (सीपीएन-एम) चे नेते शिवा सिंग ओली या निदर्शनाचे समर्थन करतात. शिवा म्हणतात, 'सध्याच्या सरकारच्या अनेक चुकीच्या निर्णयांमुळे नेपाळमधील जनता नाराज होती. सोशल मीडियावर अलिकडेच बंदी घातल्यामुळे हा राग अचानक उफाळून आला. जर सरकारला हवे असते तर ते शांततेने ते हाताळू शकले असते, परंतु तरुणांचे म्हणणे ऐकण्याऐवजी त्यांनी त्यांच्यावर लाठीमार केला. पोलिसांनी गोळीबारही केला. आमचा पक्ष या घटनेत मारल्या गेलेल्या सर्व तरुणांचा आवाज उठवेल.'

'बांगलादेश आणि श्रीलंकेत जे काही घडले, तिथेही अशीच परिस्थिती निर्माण होत आहे. सरकारी नोकऱ्यांमध्ये हेराफेरी आणि भ्रष्टाचारामुळे देशातील तरुण आधीच संतप्त होते. अशा परिस्थितीत सोशल मीडियावरील बंदीसारख्या हुकूमशाही निर्णयांमुळे परिस्थिती आणखी बिकट होत चालली आहे.'

खरे तर नेपाळमध्ये झालेल्या उद्रेकापासून भारतीय नेते, पुढारी, सत्ताधारी, विरोधक आणि एकूणच राजकारण्यांनी सावध व्हायला हवे . भारतात भ्रष्टाचार पराकोटीचा वाढला असून, भ्रष्ट नेते, पुढारी, मंत्री यांच्यावर कधीही कोणतीच कारवाई होताना दिसत नाही. प्रत्येक गोष्टीत पैसे खाण्याची त्यांना सवय पडली आहे . भ्रष्टाचार शिष्टाचार झाला आहे आणि देशातील तरूणाईमध्ये नेत्यांच्या या भ्रष्टाचाराविषयी कमालीचा संताप आहे . तो कधी, कसा आणि कोणत्या रूपात उफाळून येईल? सांगता येत नाही.

# केसीआर कुटुंबातील वाद चव्हाट्यावर!

तेलंगण राज्याच्या निर्मितीमध्ये तेलंगण राष्ट्र समितीचे सर्वेसर्वा के. चंद्रशेखर राव यांचा सिंहाचा वाटा होता. तेलंगण मधील जनतेने त्याची परतफेड म्हणून के चंद्रशेखर राव यांच्या नेतृत्वाखालील तेलंगण राष्ट्र समितीच्या हातात दोनदा राज्याची सत्ता सोपवली.

मात्र भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे २०२३ मध्ये झालेल्या तेलंगण विधानसभा निवडणुकीत तेलंगण राष्ट्र समितीला पराभव पत्करावा लागला आणि कॉंग्रेसने तेथील सत्ता काबीज केली.११९ सदस्यांच्या तेलंगण विधानसभेत कॉंग्रेसचे ६४ आमदार निवडून आले. तेलंगण राष्ट्र समितीला केवळ ३९ जागांवर समाधान मानावे लागले.

तेलंगणमध्ये लागोपाठ दोनदा विजय मिळवल्यानंतर तेलंगण राष्ट्र समितीचे सर्वेसर्वा के.च ंद्रशेखर राव यांची महत्वाकांक्षा वाढली आणि त्यांना आपला पक्ष अखिल भारतीय पातळीवर नेण्याची स्वप्ने पडू लागली. मग त्यांनी आपल्या पक्षाचे, तेलंगण राष्ट्र समिती हे नाव बदलून, भारत राष्ट्र समिती हे नाव ठेवले. परंतु पक्षाचे नवीन नाव त्यांच्याकरता फायदेशीर ठरले नाही. महाराष्ट्रातील मराठवाडा हा विभाग सोडला तर तेलंगण बाहेर इतरत्र पक्षाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. आपल्या पक्षाला अखिल भारतीय पक्ष बनवण्याचे राव यांचे स्वप्न अधुरेच राहिले आणि त्या अपयशात भर म्हणून तेलंगणची सत्ताही के. चंद्रशेखर राव यांच्या हातातून गेली.


अभय गोखले

तेलंगणमध्ये सत्ता काबीज केल्यानंतर कॉंग्रेसने भारत राष्ट्र समितीचे काही आमदार फोडून,के. चंद्रशेखर राव यांच्या पक्षाला आणखी कमकुवत केले. अर्थात त्याबद्दल कॉंग्रेसला दोष देण्यात काही अर्थ नव्हता. कारण के.चंद्रशेखर राव दोन टर्म राज्यात सत्तेवर असताना त्यांनी कॉंग्रेसचे आमदार फोडून या फोडाफोडीच्या राजकारणाचा श्रीगणेशा केला होता. २०२३ मध्ये राज्यात सत्तेवर आल्यानंतर, कॉंग्रेसने, भारत राष्ट्र समितीचे आमदार फोडून त्याचा बदला घेतला इतकेच.

तेलंगणमध्ये सत्तेवरून पायउतार झाल्यानंतर राव आणि त्यांच्या पक्षाच्या अधोगतीला सुरुवात झाली आहे. त्यातच के.चंद्रशेखर राव यांच्या कुटुंबातील भांडणामुळे ते अधिकच त्रस्त झाले आहेत. के.चंद्रशेखर राव यांची कन्या के. कविता हिची नुकतीच पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे.

पक्षविरोधी कारवायांमुळे के. कविताची पक्षातून हकालपट्टी केल्याचे सांगितले जात असले तरी प्रकरण वरवर दिसते तेवढे साधे नाही. के.कविता नाराज असल्याच्या चर्चा बरेच दिवस ऐकायला मिळत होत्या. चुलत भाऊ हरिष राव आणि संतोष राव यांच्यावर त्या नाराज असल्याचे बोलले जात होते.

मध्यंतरी के. कविता यांनी आपले वडील आणि पक्षाचे सर्वेसर्वा के. चंद्रशेखर राव यांना एक पत्र लिहिले होते. ते पत्र त्यांनी आपल्या आईच्या मार्फत के.चंद्रशेखर राव यांच्याकडे पाठवले असे म्हटले जाते. मात्र ते खाजगी पत्र लीक झाले. ते कुणी लीक केले याचा शोध लागला नाही. त्या पत्रात कविता यांनी के चंद्रशेखर राव यांच्या भोवतालच्या कोटेरीवर टिका केली होती. त्यांच्या टिकेचा रोख अर्थातच हरिष राव आणि संतोष राव यांच्या दिशेने होता.

के. चंद्रशेखर राव हे तेलंगणचे मुख्यमंत्री असताना मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केलेला कलेश्वरम लिफ्ट इरिगेशन प्रकल्प सुरू करण्यात आला.त्यामध्ये झालेल्या भ्रष्टाचारात हरिष राव आणि संतोष राव यांचा हात होता, असा आरोप कविता यांनी केला. भ्रष्टाचार त्या दोघांनी केला परंतु त्यामध्ये आपले वडील के.चंद्रशेखर राव यांचे नाव उगाचच गोवण्यात आले असे कविता यांचे म्हणणे आहे.

आता तेलंगणच्या मुख्यमंत्र्यांनी कलेश्वरम लिफ्ट इरिगेशन प्रकल्पातील भ्रष्टाचाराचे प्रकरण सीबीआयकडे सोपवले आहे. त्यामुळे के.चंद्रशेखर राव यांची आता सीबीआयकडून चौकशी होऊ शकेल. के कविता यांचे हेच दुखणे आहे. आपल्या वडिलांना विनाकारण त्रास दिला जात आहे असे त्यांना वाटते.

के. कविता यांनी आपल्या वडिलांना लिहिलेले पत्र लीक झाल्यानंतर, वेगाने घडामोडी घडल्या आणि के.चंद्रशेखर राव यांनी आपल्या कन्येची पक्षातून हकालपट्टी केली.

हरिष राव हे के. चंद्रशेखर राव यांचे पुतणे आणि कविता यांचे चुलत भाऊ आहेत. ते के. चंद्रशेखर राव यांच्या अगदी निकटचे मानले जातात.के.चंद्रशेखर राव हे मुख्यमंत्री असताना हरिष राव हे त्यांच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे विभागाचे मंत्री होते. के. टी. रामाराव हे के. चंद्रशेखर राव यांचे सुपुत्र असून, कविता यांचे सख्खे भाऊ आहेत. ते पक्षाचे कार्याध्यक्ष असून, के.चंद्रशेखर राव यांचे राजकीय वारसदार आहेत.

के. टी. रामाराव यांच्यावर के कविता या नाराज नसल्या तरी त्यांनी पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे, रामाराव हे कविता यांच्यावर नाराज असल्याचे सांगितले जाते. रक्षाबंधनाच्या दिवशी आपल्या भावाला म्हणजेच के. टी. रामाराव यांना राखी बांधण्याची कविता यांची इच्छा होती, परंतु ते तेंव्हा बंगळूरुला गेल्याने त्यांना राखी बांधता आली नाही, असे म्हटले जाते. असेही बोलले गेले की कविता यांना टाळण्यासाठी के. टी.रामाराव हे जाणूनबुजून तेंव्हा बंगळूरुला गेले होते. एकंदरीत कविता यांची पक्षातून हकालपट्टी झाल्यानंतर के. चंद्रशेखर राव यांच्या कुटुंबातील वाद चव्हाट्यावर आले असून, कविता यांची पुढची चाल काय असेल, याचे उत्तर येणारा काळच आपल्याला देऊ शकेल.

■ ■ ■

# एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात ठेवणे काळाची गरज!

एकेकाळी घरोघरी एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात होती. त्यामुळे घरोघरी सुखी, समाधानी व आनंदी वातावरण पाहायला मिळायचे. एकमेकांच्या मदतीला धावून जाणे, एकमेकांना आर्थिक मदत करणे, एकमेकांच्या सुखदुःखात धावून जाणे आणि एकमेकांना मायेने व आपुलकीने बोलणे हे सारे एकत्र कुटुंब पद्धतीत आपल्याला प्रकर्षाने पाहायला मिळायचे.

त्याकाळी सख्ख्या भावांमध्ये प्रेम, माया व आपुलकी ठासून भरलेली होती. म्हणून तेव्हा भावंडांमध्ये कधीच आताच्या एवढे वाद-विवाद होत नव्हते. भाऊ भावाचा मनःपूर्वक आदर करत होता. एका भावावर संकट आले तर दुसरा भाऊ वाऱ्याच्या वेगाने धावून आपल्या भावाला आधार द्यायचा. एका भावाला दुःख झाले तर दुसऱ्या भावाला अतोनात वेदना व्हायच्या.

छोटा भाऊ मोठ्या भावाचा आदर राखायचा. मोठ्या भावाचा विचार घेऊनच छोटा भाऊ पुढील वाटचाल करायचा. एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात असल्यामुळे आई वडील व आजी आजोबा यांचे एकत्र कुटुंबात मोलाचे योगदान असायचे. आई-वडिलांमुळे व आजी आजोबांमुळे लहान मुलांवर संस्काराची पेरणी अतिशय चांगल्या पद्धतीने व्हायची.

एकत्र कुटुंब पद्धतीमुळे एकमेकांबद्दल असणारा मायेचा ओलावा आणि एकमेकांबद्दल असणारी प्रेमाची व आपुलकीची भावना ही ठळकपणे दिसायची. लहान मुले व नातवंड आजी आजोबांच्या संस्कार छायेखाली लहानाचे मोठे व्हायचे. आजी आजोबा देखील त्यांना जिवापाड जपायचे.

एकत्र कुटुंब पद्धतीमुळे शेती सुद्धा एकत्र केली जायची. त्यामुळे शेतीमध्ये शेतमाल भरमसाठ व्हायचा. शेतीमध्ये आलेली बरकत पाहून शेतकरी आनंदात न्हाऊन निघायचे.

एकत्र कुटुंब पद्धतीमुळे प्रत्येक घरात व कुटुंबात एकमेकांबद्दल प्रेम, माया, आपुलकी व जिव्हाळा जणू काय मानवतेचा संदेश देत होता. घरोघरी माया, ममता व मानवता आनंदाने नांदत होती.

एकत्र कुटुंब पद्धतीचा फायदा असा व्हायचा की, घरातील ज्येष्ठांना म्हणजेच वृद्ध आई-वडिलांना घराबाहेर काढून वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवणारे महाभाग एकत्र कुटुंब पद्धतीत अस्तित्वात नव्हते. कारण एकत्र राहिल्यामुळे माणसांमध्ये एकमेकांबद्दल प्रेम भावना वाढीस लागते. एकमेकांबद्दल लळा लागतो आणि त्यांच्यातील असलेले नातेसंबंध अधिक घट्ट होऊन ते वेळप्रसंगी एकमेकांवर जीव ओवाळून टाकायला सुद्धा तयार होतात.

एकत्र कुटुंब पद्धतीमुळे आपल्या घरावर वाईट नजरेने बघायची कोणाची हिंमत सुद्धा होत नाही. कारण एकत्र कुटुंब पद्धती एकीचे दर्शन घडवते. पण असे एकीचे दर्शन घडवणारी एकत्र कुटुंब पद्धती हल्ली कुठेच अस्तित्वात राहिली नाही. हीच या देशाची खरी शोकांतिका आहे.


बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, ता.अहमदपूर
जि. लातूर
7498715661

एकेकाळी एकत्र असणारे कुटुंब आता विभक्त झाले आहे. कारण काळानुसार माणसांमध्ये बदल होत गेला, माणसांची नीतिमत्ता बदलली, माणूस स्वार्थी व लोभी बनला. स्वतःसाठी आणि बायको मुलांसाठी जगणे हेच त्याचे जीवन ध्येय बनले आहे.

म्हणजे आजकालचा माणूस आपल्याच बायको मुलांत गुरफटून गेला आहे. त्याला घरातील सदस्य म्हणजेच आई वडील, बहिण भाऊ, आजी आजोबा आणि समाजबांधव यांचा काहीही संबंध राहिलेला नाही. फक्त आपणच कसे मोठे व्हावे आणि आपल्याच जवळ सर्वात जास्त पैसा व संपत्ती कशी गोळा होईल हा विचार प्रत्येक माणूस करत आहे.

----------------

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

■ ■ ■

## यंदाही उंच गणेश मुर्त्या समुद्र किनाऱ्यावरच!

वाचक लिहितात

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी गिरगाव चौपाटीच्या किनाऱ्यावर कितीतरी उंच गणेशमूर्त्या विसर्जनाविना उभ्या होत्या तर कितीतरी मुर्त्या किनाऱ्यावर कोसळून छिन्न विच्छिन्न अवस्थेत पडलेल्या होत्या.

ज्या श्री गणेशाला दहा दिवस मनोभावे पुजले जाते, त्याच्या चरणी नवस केले जातात, त्याच्या आगमनासाठी सुंदर सजावट केली जाते, वाजत गाजत त्याची मिरवणूक काढली जाते अशा गणेश मूर्तीची झालेली अवहेलना पाहून मनाला वेदना होतात. उंच मुर्त्यांचे दर्शन घेण्यासाठी देश विदेशातून लाखो भाविक दरवर्षी मुंबईत येत असतात. मात्र याच उंच मुर्त्या दुसऱ्या दिवशी समुद्राच्या किनारी पाहिल्यावर गणेश मूर्ती ही शोभेची आणि प्रदर्शनाची वस्तू बनू लागली आहे का असा प्रश्न पडतो.

यंदा भरती ओहोटीच्या अंदाज चुकल्याने दरवर्षी सकाळी १० वाजेपर्यंत होणारे लालबागच्या राजाचे विसर्जन यंदा १० तास लांबले तरीही लालबागच्या राजा मंडळाने बाप्पाचे नेहमीप्रमाणेच साजेसे विसर्जन केले. मग उंच मुर्त्या आणणारे या मुर्त्यांचे खोल समुद्रात विसर्जन का करत नाहीत? मंडळाकडे तेव्हढे कार्यकर्ते नाहीत, किंवा भांडवल नाही तर ही मंडळे उंच मुर्त्या तरी का आणतात?

अनंत चतुर्दशीला अनेक मंडळे बाप्पाच्या चरणाला पाणी लागले की तेथून पळ काढतात. भरती सरल्यावर या उंच मुर्त्या किनाऱ्यावर उभ्या असलेल्या पाहायला मिळतात. अशा मूर्त्यांना मग क्रेनच्या आधारे खाली पाडून त्यांना भग्न करावे लागते. ज्या गणेशाच्या नावाने १० दिवस उत्सव साजरा केला जातो त्याचा केव्हढा हा अवमान. गणेशोत्सव हा मौजेचा नव्हे तर श्रद्धेचा उत्सव आहे; मात्र हल्ली आपल्या मंडळाची मूर्ती किती उंच आहे हे दाखवण्याची स्पर्धा मंडळांमध्ये रंगताना पाहायला मिळते ज्यामध्ये श्रद्धेला सोयीस्करपणे तिलांजली दिली जाते. उंच गणेशमूर्त्या किनाऱ्यावर सोडून पळ काढणाऱ्या, त्यांचे योग्य पद्धतीने विसर्जन न करणाऱ्या मंडळांवर खरेतर कारवाई करून त्यांना पुढील वर्षी उंच मूर्ती आणण्यास प्रतिबंध घातला पाहिजे.

■ सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.

# पावसाळ्यात डेंग्यूपासून बचावासाठी काय करावं?



पावसाळा सुरू होताच अनेक आजारांना सोबत घेऊन येतो. पावसाळ्यात अनेकांना संसर्गाच्या समस्या होतात. पावसाळ्यात तुमची रोगप्रतीकारकशक्ती वाढवणे गरजेचे असते. पावसाळ्यात डेंग्यूचे डास सर्वाधिक प्रजनन करतात.

अशा परिस्थितीत या ऋतूत डेंग्यू तापाचा धोका खूप वाढतो. जेव्हा डेंग्यूचा डास चावतो तेव्हा तुम्हाला जास्त ताप, डोकेदुखी, डोळे दुखणे आणि अगदी हाड दुखणे यासारख्या समस्या उद्भवतात.

या काळात रोगप्रतिकारक शक्ती देखील खूप कमकुवत होते, ज्यामुळे प्लेटलेट्स वेगाने कमी होऊ लागतात. डेंग्यू हा सामान्य ताप नाही, परंतु यामध्ये शरीर पूर्णपणे तुटू लागते. ज्यामध्ये औषधांसोबतच अन्नाची काळजी घेणे तुमच्यासाठी महत्त्वाचे आहे.

डेंग्यूपासून बरे होण्यासाठी चांगला आहार घेणे खूप महत्वाचे आहे. जर तुम्ही योग्य आहार घेतला तर शरीरातील कमजोरी दूर होण्यास, प्लेटलेट्स वाढविण्यास, रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास तसेच रक्त वाढवण्यास खूप मदत होते. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला किंवा तुमच्या कुटुंबातील कोणाला डेंग्यू झाला असेल तर ही माहिती फक्त तुमच्यासाठी आहे. डेंग्यू झाल्यावर काय खावे आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात?

तज्ञांच्या मते, डेंग्यूच्या ४० ते ५० टक्के आजारांवर घरी उपचार करता येतात. फक्त योग्य आहाराची गरज आहे. डेंग्यूमध्ये द्रवपदार्थांचे सेवन जास्त करावे, कारण या काळात शरीरात पाण्याची कमतरता असते, जी द्रवपदार्थ घेऊन पूर्ण करता येते. तसेच, वेळोवेळी प्लेटलेट्स तपासले पाहिजेत.

जर प्लेटलेट्सची संख्या १५ हजारांपेक्षा कमी असेल तर रुग्णालयात दाखल होण्याची परिस्थिती उद्भवू शकते. डेंग्यू तापात औषधांव्यतिरिक्त द्रव पदार्थांचे जास्तीत जास्त सेवन करावे. यासाठी नारळपाणी सर्वोत्तम आहे. त्यात व्हिटॅमिन सी, बी-कॉम्प्लेक्स जीवनसत्त्वे, अँटीऑक्सिडंट्स आणि अमीनो ॲसिड आढळतात, जे शरीराला हायड्रेट करण्याचे अनेक फायदे देतात. याशिवाय, तुम्ही गाजराचा रस, पपईचा रस आणि डाळिंबाचा रस घेऊ शकता.


तज्ज्ञांचे म्हणणे आहे की जेव्हा आपल्याला डेंग्यू होतो तेव्हा आपण तेलकट मसालेदार पदार्थ आणि रस्त्यावरील पदार्थ खाणे टाळले पाहिजे. चहा आणि कॉफीपासूनही दूर राहिले पाहिजे. डेंग्यूच्या काळात जास्त गोड पदार्थ खाऊ नका. कारण त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते.

जर तुम्ही मद्यपान आणि धूम्रपान करत असाल तर यापासूनही दूर राहा. डेंग्यू झाल्यास, अन्नासोबतच जीवनशैलीशी संबंधित अनेक गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. हेल्थलाइनच्या मते , डेंग्यू झाल्यास, खूप गर्दीच्या आणि प्रदूषित ठिकाणी जाणे टाळावे. नेहमी पूर्ण बाह्यांचे कपडे आणि मोजे घाला. घराच्या खिडक्या बंद ठेवा. डेंग्यूपासून बचाव करण्यासाठी वरील उपाय करायला हवे.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### सोच भाई सोच

खाली हात येणे
खाली हात जाणे
हा नियतीचा प्रण ..

मग दृष्कृत्ये करून
तू कोणासाठी -
जमवतोस धन ? ..

नाती गोती मृगजळ
जसे ज्याचे कर्म
तसे ईश्वर देतो फळ ...

# आठ महिन्यांत ११८३ शेतकरी आत्महत्या; पण सरकार शांत!

मुंबई, दि. १० : प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी महायुती सरकारने दिलेली आश्वासने केवळ धुळीत मिळाल्याचं आता उघड होत आहे. गेल्या आठ महिन्यांत तब्बल ११८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा आरोप विरोधकांनी केला असून, हे आकडे सरकारच्या असंवेदनशीलतेचं प्रमाण मानलं जात आहे.

काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार यांनी आकडेवारी जाहीर करत सरकारवर थेट हल्लाबोल केला. त्यांच्या मते, पश्चिम विदर्भात ७०७ आणि छत्रपती संभाजीनगर विभागात ५२० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. "सत्तेसाठी महायुती सरकारने कर्जमाफीचं खोटं स्वप्न दाखवलं. शेतकऱ्यांना मदत न देता केवळ समित्या नेमण्यात आल्या. पण शेतकऱ्यांच्या हातात आलं काय? फक्त रिकाम्या आश्वासनांचं ओझं!" अशी टीका त्यांनी केली. अतिवृष्टीने पिकं उध्वस्त झाली, बँका कर्ज देत नाहीत, हातात काहीच राहिलं नाही म्हणून हतबल शेतकरी टोकाचं पाऊल उचलत आहेत. मात्र, सरकारकडून कोणतीही ठोस मदत न मिळाल्याने शेतकऱ्यांचा संताप उसळला आहे.

याचवेळी कृषी खात्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा होण्याऐवजी "कर्मचाऱ्यांना टॅब द्यायचे की लॅपटॉप?" या विषयावरून वाद सुरू आहेत, ही बाब विरोधकांनी चीड आणणारी असल्याचं म्हटलं.

"शेतकरी मेला तरी सरकार भांडणांत मशगूल आहे. हे सरकार गेंड्याच्या कातडीचं असून, शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी तेच थेट जबाबदार आहे," असा घणाघात वडेट्टीवार यांनी केला.

# महाराष्ट्राचे नवे राज्यपाल कोण ? सीपी राधाकृष्णन राजीनामा देणार
## १२ सप्टेंबरला घेणार उपराष्ट्रपतीपदाची शपथ

मुंबई, दि. १० : प्रतिनिधी

महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन देशाचे नवे उपराष्ट्रपती बनले आहेत. जगदीप धनखड यांनी अचानक राजीनामा दिल्याने मध्यावधी निवडणूक लागली होती. यावेळी एनडीएने राधाकृष्णन यांना उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत राधाकृष्णन यांचा मोठा विजय झाला आहे. यामुळे ते महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा राजीनामा देणार आहेत. यामुळे महाराष्ट्राचे नवे राज्यपाल कोण होणार, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्रात सध्या स्थिर सरकार आहे. पुढील चार वर्षे तरी या सरकारला धोका दिसत नाही. यामुळे महाराष्ट्राच्या नव्या राज्यपालांवर सध्यातरी मोठी जबाबदारी येणार नाही. यामुळे या स्थिर वातावरणात कोण राज्यपाल होणार याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. परराज्यातूनच भाजप, आरएसएसचा एखादा नेता महाराष्ट्रात राज्यपाल म्हणून येण्याची शक्यता जास्त आहे.



राधाकृष्णन हे येत्या दोन दिवसांत महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा राजीनामा देण्याची शक्यता आहे. राधाकृष्णन यांचा उपराष्ट्रपती पदाचा शपथविधी सोहळा १२ सप्टेंबरला होण्याची शक्यता आहे. आज या तारखेवर शिक्कामोर्तब होणार आहे. यामुळे यापूर्वीच त्यांना राज्यपाल पद सोडावे लागणार आहे. महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची धुरा तात्पुरती इतर राज्यांच्या राज्यपालांकडे दिली जाण्याची शक्यता आहे.

इंडिया आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश बी सुदर्शन रेड्डी हे उमेदवार होते. सीपी राधाकृष्णन यांना ४५२ मते मिळाली आहेत. तर बी सुदर्शन रेड्डी यांना ३०० मते मिळाली.

# धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत तालुकास्तरीय मास्टर ट्रेनर्सचे निवासी प्रशिक्षण यशस्वीरित्या संपन्न

रायगड, दि. १० : प्रतिनिधी

धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत दि.8 ते 10 सप्टेंबर 2025 दरम्यान तालुकास्तरीय मास्टर ट्रेनर्ससाठी निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, रामनिधी, खोपोली येथे करण्यात आले. या प्रशिक्षणाचे उद्घाटन (दि.9 सप्टेंबर रोजी) जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते झाले.




या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी, श्रीमती नेहा भोसले, तहसिलदार कर्जत डॉ.धनंजय जाधव, गटविकास अधिकारी संदीप कराड, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पेण, श्रीमती तेजस्विनी गलांडे हे मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी श्री.जावळे यांनी प्रशिक्षणार्थींना संबोधित करताना सांगितले की, रायगड जिल्ह्यातील 113 आदिवासी वाड्यांमध्ये सर्वसमावेशक योजना राबवून वाड्यांचा समृद्ध विकास साधण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी त्यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आणि मास्टर ट्रेनर्सना आवश्यक त्या उपाययोजना प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना दिल्या. जिल्हाधिकारी स्वतः प्रत्येक तालुक्यातील दोन वाड्यांना भेट देऊन ग्राम विकास आराखड्यांचा आढावा घेणार असून, सर्व 113 वाड्यांचे आराखडे स्वतः तपासून शासनाकडे सादर करण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या तीन दिवसीय प्रशिक्षणामध्ये तालुकास्तरावरील 71 मास्टर ट्रेनर्सना जनजातीय गावांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक कौशल्य व माहिती प्रदान करण्यात आली. प्रशिक्षणामध्ये विविध योजना, समुदाय संवाद, ग्रामविकास आराखडा निर्मिती आणि नेतृत्व क्षमता या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील आदिवासी वाड्यांच्या शाश्वत आणि समावेशी विकासासाठी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले गेले असून या उपक्रमामुळे स्थानिक समुदायाचा सक्रिय सहभाग वाढून, योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होणार आहे.

# मालेगाव बॉम्बस्फोट हल्ल्यातील पीडित उच्च न्यायालयात

मुंबई, दि. १० : प्रतिनिधी

मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यात भाजपच्या माजी खासदार प्रज्ञा सिंह ठाकूर यांच्यासह कर्नल प्रसाद पुरोहित व अन्य पाच आरोपींना निर्दोष मुक्त करण्याच्या विशेष सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले आहे. हल्ल्यातील पीडितांनी दाखल केलेल्या अपिलावर न्यायमूर्ती अजय गडकरी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर 15 सप्टेंबरला सुनावणी होण्याची शक्यता आहे.

या अपिलात दोषपूर्ण तपास किंवा तपासातील काही त्रुटी आरोपींना निर्दोष सोडण्याचे कारण असू शकत नाही, असा दावा करण्यात आला असून आरोपींच्या सुटकेचा निर्णय रद्द करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. या याचिकेमुळे प्रज्ञासिंगसह अन्य आरोपींच्या अडचणी वाढण्याची चिन्हे आहेत.

मालेगाव येथे 29 सप्टेंबर 2008 रोजी मशिदीजवळ मोटारसायकलवर बॉम्बस्फोट घडवण्यात आला. या घटनेत 6 ठार, तर 100 हून अधिक जण जखमी झाले. राष्ट्रीय तपास यंत्रणेने भाजप खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांच्या विरोधात बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा (युएपीए), आयपीसी अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. तर श्याम साहू, प्रवीण टकल्की, रामजी कालसंग्रा आणि संदीप डांगे यांना यात फरार आरोपी दाखवण्यात आले आहे.

अनेक साक्षीदार पुरावे तपासल्यानंतर तसेच सर्व पक्षकारांचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर विशेष न्यायालयाने या प्रकरणाचा 31 जुलै रोजी निकाल जाहीर केला व सातजणांची सुटका केली. मात्र सत्र न्यायालयाच्या या निकालाला बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. निसार अहमद सय्यद बिलाल यांच्यासह अन्य पाच जणांनी अ‍ॅड. मतीन शेख यांच्यामार्फत हे अपील दाखल केले असून विशेष न्यायालयाचा निर्णय रद्द करण्याची प्रमुख मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

# गर्भधारणा रोखणाऱ्या किशोरवयीन मुलींच्या गोपनीयतेचे रक्षण करा!

मुंबई, दि. १० : प्रतिनिधी

नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांकडे जाऊन गर्भधारणा संपुष्टात आणण्यासाठी येणाऱ्या किशोरवयीन मुलींच्या गोपनीयतेचे रक्षण करण्यासाठी तीन आठवड्यांत मार्गदर्शक तत्त्वे तयार करा आणि ती गाईडलाईन्स अधिसूचित करा, असे निर्देश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. गर्भधारणा संपवण्यासाठी डॉक्टरांकडे जाणाऱ्या किशोरवयीन मुलींची माहिती पोलीस मागतात. यातून मुलींची ओळख उघड होत असल्याच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने हा आदेश दिले.

मुंबईतील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. निखिल दातार यांच्यासह काही डॉक्टरांनी यासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकेवर न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाने सुनावणी घेतला आणि राज्य सरकारला मार्गदर्शक तत्वे आखण्याबाबत कार्यवाहीला वेग देण्याचा आदेश दिला.

पोलिस त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन करत आहेत. सहमतीने झालेल्या शारिरिक संबंधांनंतर वैद्यकीय गर्भपात अर्थात एमटीपीसाठी त्यांच्याकडे येणाऱ्या किशोरवयीन मुलींची नावे मागतात. यातून किशोरवयीन मुलींची ओळख उघड होत आहे, असा दावा याचिकाकर्त्या डॉक्टरांनी उच्च न्यायालयात केला. त्याची गंभीर दखल घेत खंडपीठाने राज्य सरकारला ठोस पावले उचलण्याचे निर्देश दिले. पोक्सो कायदा, 2012 अंतर्गत सध्याचे किशोरवयीन मुलांमधील सहमतीने झालेल्या संबंधांच्या प्रकरणांमध्ये अडचणी निर्माण करीत आहे, याकडे याचिकाकर्त्या दातार यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. त्याचीही नोंद खंडपीठाने करुन घेतली.

# टीईटीवरुन लाखो शिक्षकांचे भवितव्य अडचणीत!

मुंबई, दि. १० : प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निर्णयामुळे राज्यातील एक लाखाहून अधिक शिक्षकांच्या करिअरवर गडद संकट ओढावले आहे. सेवेत असलेल्या शिक्षकांना पात्रतेसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण करणे बंधनकारक ठरणार आहे. या निर्णयामुळे अल्पसंख्याक संस्थांसह राज्यभरातील शाळांवर परिणाम होणार असून, शिक्षकवर्गात भीती व संतापाचे वातावरण पसरले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने 1 सप्टेंबर रोजी दिलेल्या निर्णयानुसार जिल्हापरिषद, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिकामधील अनुदानित, अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होणे अनिवार्य केले आहे.

पुरोगामी शिक्षक संघटनेने या निकालाला जोरदार विरोध दर्शवला आहे. राज्याध्यक्ष तानाजी कांबळे यांनी स्पष्ट केले की, सरकारचा 2013 चा निर्णय अजूनही लागू आहे. 2013 पूर्वी नियुक्त शिक्षकांसाठी टीईटी बंधनकारक करू नये. 2013 नंतर नियुक्त झालेल्यांनी मात्र परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. सरकारने शिक्षकविरोधी भूमिका घेतल्यास संघटना न्यायालयीन लढा, मंत्रीस्तरीय पाठपुरावा आणि राज्यव्यापी आंदोलन करणार असल्याचे ते म्हणाले. 2013 पूर्वी नियुक्त शिक्षकांवर जबरदस्तीने टीईटी लादणे म्हणजे लाखो शिक्षकांचे भविष्य धोक्यात घालणे होय. हा अन्याय कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असे शिक्षकांचे म्हणणे आहे. शिक्षणाचा हक्क कायदा (आरटीई) 2011 पासून टीईटी ही आवश्यक पात्रता आहे. राज्य सरकारने 2013 पूर्वी नियुक्त शिक्षक आणि अल्पसंख्याक संस्थांना सूट दिली होती; मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे ही सवलत संपुष्टात आली आहे. असेही शिक्षकांनी सांगितले. दरम्यान, शिक्षक भारती संघटनेने हा मुद्दा थेट भारताचे मुख्य न्यायमूर्ती यांच्यापर्यंत नेला आहे. पत्राद्वारे संघटनेने टीईटी परीक्षांतील अनेक त्रुटी अधोरेखित केल्या आहेत.

मूल्यमापनातील चुका, निकाल जाहीर करण्यात झालेला विलंब आणि तक्रार निवारणाचा अभाव यामुळे हजारो उमेदवारांना फटका बसल्याचे शिक्षक भारतीचे सुभाष मोरे यांनी निदर्शनास आणले. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर शिक्षक भारती संघटनेने रविवारी ऑनलाईन सभा घेतली. सदर बैठकीत सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश भूषण गवई यांना पत्र देऊन निर्णयासंदर्भात पुनर्विचार करण्याची मागणी करण्याचे सर्वानुमते ठरले, अशी माहिती मोरे यांनी दिली.

शिक्षक भारती संघटनेच्या बैठकीत झालेल्या चर्चेत ज्येष्ठ समाजवादी नेते माजी शिक्षक आमदार कपिल पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयाला पत्र देऊन निर्णयाचा पुनर्विचार करण्याची विनंती करावी, असे सुचविले. त्याला सर्वानुमते मंजुरी दिली आहे. तसेच सदर बैठकीत शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे यांनी सदर निर्णयाबाबत राज्यातील सर्व शिक्षकांमध्ये जागृती निर्माण करून राज्यव्यापी जागृती मोहीम राबवण्याचे आवाहन केले. दरम्यान, सध्याच्या घडीला शिक्षक संघटनांचा दबाव वाढला असून, सरकारने तातडीने स्पष्ट भूमिका न घेतल्यास राज्यातील शिक्षण व्यवस्थेचे भवितव्यच अडचणीत येईल, असा इशारा संघटनांनी दिला आहे. पहिली ते आठवीपर्यंतच्या वर्गांना शिकवणाऱ्या शिक्षकांना पुढील दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण न झाल्यास सक्तीने सेवानिवृत्ती घ्यावी लागणार आहे. तसेच ज्यांची सेवा पाच वर्षापेक्षा कमी कालावधीची असेल त्यांना पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक केले आहे.

## आज का अंदाज

गुरूवार ११ सप्टेंबर २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| ६७९ | ३३६ | ११४ | २८९ | ३५५ | २४८ | ७९९ | २२४ |
| ४९९ | ४४७ | २७७ | ३७९ | ६७० | ३५६ | १२२ | ३५० |
| १२९ | ५०० | ३३० | ४७८ | ४९० | ७७० | ३५७ | ४५९ |
| २० | ५० | ४३ | ९३ | ३२ | ४० | ५१ | ८१ |
| २४ | ५४ | ६१ | ९१ | ३० | ४२ | ५७ | ८७ |
| २८ | ५८ | ६७ | ९७ | ३६ | ४६ | ५९ | ८९ |

११ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४६ | ७६ |
| ०५ | १५ | ४९ | ७९ |
| ०८ | १८ | ४३ | ७३ |
| १९० | ३३५ | १६७ | १३३ |
| २९९ | ५७९ | ३५६ | ३६८ |
| ३८९ | २९० | ४०० | ५५७ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ८ ९ ७ ६

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून नवरात्री ऑफरची घोषणा

**मुंबई, १० सप्टेंबर :** सणासुदीच्या काळामध्ये अधिक उत्साहाची भर करत टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने ग्राहकासांठी दुप्पट फायद्याची घोषणा केली. कार व एसयूव्हींवर नुकतेच जाहीर करण्यात आलेल्या जीएसटी दरामधील कपातीचे संपूर्ण फायदे दिल्यानंतर टीकेएम प्रश्चिम प्रांतामधील ग्राहकांसाठी विशेष मोहिम 'बाय नाऊ अँड पे इन २०२६'सह नवरात्रीच्या आनंदामध्ये अधिक उत्साहाची भर करत आहे. जीएसटी दर कपात आणि टोयोटाची फेस्टिव्ह ऑफर असे दुहेरी फायदे या काळाला ग्राहकांना त्यांची आवडती टोयोटा वेईकल खरेदी करण्यासाठी परिपूर्ण करतात, जसे अर्बन क्रूझर हायरायडर, टोयोटा ग्लान्झा किंवा टोयोटा टायसर.



जीएसटी दर कपात २२ सप्टेंबर २०२५ पासून लागू होणार असताना 'बाय नाऊ अँड पे इन २०२६' ऑफर ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत वैध आहे, जी फक्त पश्चिम भारतातील (महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश व गोवा) अधिकृत टोयोटा डिलरशिप्समध्ये उपलब्ध आहे.

ऑफरची वैशिष्ट्ये व फायदे (जवळपास १,००,००० रूपयांपर्यंत):

३-महिने ईएमआय हॉलिडे - पहिल्या तीन महिन्यांसाठी प्रति महिना फक्त रूपये भरा: नियमित ईएमआय जानेवारी २०२६ पासून सुरू होतील.

५ कॉम्प्लीमेण्टरी सर्विस सेशन्स - परिपूर्ण समाधानाची खात्री देतात.

५-वर्ष एक्स्टेण्डेड वॉरंटी - टोयोटाच्या टिकाऊपणा व विश्वसनीयतेप्रती कटिबद्धतेला अधिक दृढ करते.

कॉर्पोरेट अँड एक्स्चेंज बोनस - कॉर्पोरेट ग्राहकांसाठी आणि एक्स्चेंजचा अवलंब करणाऱ्या ग्राहकांसाठी अतिरिक्त बचत.

संरक्षण कर्मचाऱ्यांसाठी विशेष फायदे - विशेष विशेषाधिकारासह देशाच्या संरक्षकांचा सन्मान.

## राशीभविष्य

**मेष :** आज दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातम्यांनी होईल. नोकरीत वरिष्ठ अधिकाजयांच्या जवळीकतेचा फायदा मिळेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस असेल. महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील.

**वृषभ :** जंगम आणि स्थावर मालमत्ता वादाचे कारण बनू शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या नशिबाचा तारा चमकेल. जुन्या प्रकरणात निर्णय तुमच्या बाजूने येण्याचे संकेत आहेत. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मिथुन :** आर्थिक बाबींचा आढावा घेतल्यानंतर धोरणात्मक निर्णय घ्या. तुमच्या बचतीचा योग्य वापर करा. कामानिमित्त परदेशात जाण्याचा योग येईल. पहिल्यांदाच विमान प्रवास करण्याचीही संधी मिळेल.

**कर्क :** आज कौटुंबिक जबाबदाजयांचा भार वाढू शकतो. नातेवाईकांशी समन्वय ठेवा. लग्न वगैरे होण्याची शक्यता आहे. तुमच्या काहीही बोलण्यापूर्वी विचार करा. काम पूर्ण होईपर्यंत त्यावर चर्चा करू नका.

**सिंह :** आज सुरू असलेल्या कामात प्रगती होण्याची शक्यता आहे. समाजात तुम्हाला आदर मिळेल. व्यवसायात नवीन करार फायदेशीर ठरेल. विरोधकाच्या कारवायांवर विशेष लक्ष द्या.

**कन्या :** चांगले वर्तन ठेवा. कौटुंबिक समस्या सोडवण्यावर लक्ष केंद्रित करा. तुमचा संयम ढळू देऊ नका. जमीन, इमारत, वाहन विक्रीसाठी हा काळ सामान्यत: चांगला असेल.

**तुळ :** आज तुम्हाला तुमच्या मागील प्रयत्नांचे फळ मिळेल. स्वत:वर विश्वास ठेवा. कामाच्या ठिकाणी नियोजनबद्ध पद्धतीने काम करणे शुभ राहील. स्पर्धेचा निकाल अनुकूल राहील.

**वृश्चिक :** आज तुम्हाला व्यवसायात काही अडथळे येऊ शकतात. कोणत्याही महत्त्वाच्या कामाची जबाबदारी दुसजया कोणावरही देऊ नका. ते काम स्वत: करा. राजकारणात पाठिंबा मिळेल.


**धनु :** नोकरीत कनिष्ठ आणि वरिष्ठ अधिकाजयांशी समन्वय राखण्याचा प्रयत्न करा. कामाच्या ठिकाणी व्यस्त असताना वादविवाद टाळा. व्यवसायात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागेल.

**मकर :** आज तुम्हाला व्यवसायात तुमच्या जोडीदाराचा पाठिंबा आणि साथ मिळेल. रोजीरोटीच्या क्षेत्रात काम करणाजया लोकांना नोकरीत त्यांच्या सहकाजयांशी अधिक समन्वय निर्माण करावा लागेल.

**कुंभ :** विश्वासघातापासून सावध रहा. कामाच्या ठिकाणी सुरू असलेले अडथळे कमी होतील. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे. लांबच्या प्रवासाला जाण्याची शक्यता आहे.

**मीन :** व्यवसाय क्षेत्रात काम करणाजया लोकांना व्यवसायात नफा मिळण्याचे संकेत मिळतील. तुमच्या नोकरीत वरिष्ठ अधिकाजयांशी जवळीक असल्याने तुम्हाला फायदा होईल.

## शब्दकोडे क्रमांक २२१४



**आडवे शब्द :-**
१) आदर्श दांपत्य
७) संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१०) खिडकी
११) बोकड एडका
१२) नमस्काराचा एक प्रकार
१३) रेशीमाचे जाडसर कापड
१५) हिंमत, धैर्य
१७) वेळ
१८) चिंतन
२०) पिता, निर्माता
२१) यज्ञ
२२) लोणी
२५) च्या बरोबर
२६) छिद्र, दोष, न्यून
२७) परमेश्वर
२९) नंतर
३१) काळी मैना
३४) आवाज
३६) शिक्षक
३७) पत्र
३९) दात
४०) संस्थेचे धोरण ठरविणारा व चालविणारा
४१) जतन, काळजी
४२) सोन्याचा पर्वत
४४) प्रतिष्ठा, अब्रू
४६) बशीचा जोडीदार
४७) विविध
४८) बाई
५०) हात
५१) टणक
५४) नारायणराव पेशव्यांचे अखेरचे उद्गार
५७) श्वसनेंद्रिय
५८) माल साठविण्याची जागा
५९) प्रहर
६१) पृष्ठभागावरील छोटा तुकडा
६३) चेतक घोड्याचा मालक असलेला राजा ** *** सिंग
६५) नाचणी धान्याचे एक नाव
६६) संन्यासाचे निवासस्थान
६७) कट्टर, मताशी ठाम असलेला
६८) कमळ
७०) उपासना, प्रार्थना, पूजा
७१) अभिप्राय, हेतू, अर्थ
७३) वांती
७५) राजा
७६) समशेर
७७) अंग रगडणे, चोळणे

**उभे शब्द :-**
१) कपाळ
२) सुंदर, शहाणा
३) पोपट
४) पुरुन ठेवले द्रव्य
५) चालविणारा
६) पादत्राण
७) पळून जाणे
८) ** दाम दंड भेद
९) नेत्र
१२) सारखा
१४) सखी, मैत्रीण
१६) मध
१७) ठाणवई
१८) ** माऊ-मांजर
१९) मान खाली घालणे विनम्र होणे
२०) गरळ, विष
२३) छाती
२४) सरसकट
२५) संपूर्ण
२८) बाण
३०) मगज
३२) नमस्कार
३३) ढग
३५) पाहिला ऋतू
३६) धनी
३८) घोडे बांधण्याची जागा
३९) रचना करणारा
४२) लाकडाचा वा दगडाचा पातळ तुकडा
४३) अक्षरापुढची उभी रेघ
४४) आत्म्याचा दुसऱ्या शरीरात प्रवेश
४५) अनुमती
४६) वैताग, बडबड
४८) चौक
४९) पुष्पगुच्छ
५०) केस
५२) हरभरा(हिं )
५३) त्वेष, आवेश
५५) माया, प्रेम
५६) बातमी
६०) वंदनाचा एक शब्द
६२) सिंह
६३) पोपट
६४) वाचेच्या चार अवस्थेतील पहिली, श्रेष्ठ भक्ती
६५) समुद्रातील तांबड्या रंगाचा मासा
६७) तंबू, नाटक यामधील कापडी भिंत
६९) आयुष्य, पाणी
७०) करवत
७१) अजगर
७२) मृत्युराजा
७४) व्यापारी फायदा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# माजी नगरसेवक निमसे यांचा जामीन न्यायालयाने फेटाळला

## राहुल धोत्रे खून प्रकरण



**नाशिक ।** गेल्या महिनाभरापासून गाजत असलेल्या राहुल धोत्रे खून प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी तथा भाजपचे माजी नगरसेवक उध्दव निमसे यांचा जामीन अर्ज उच्च न्यायालयाने फेटाळून लावला आहे. याशिवाय या प्रकरणात निमसे यांच्यावर अटकेची कारवाई करण्यास चालढकल केल्याने न्यायालयाने पोलिसांवरही ताशेरे ओढले आहे.

राहुल धोत्रे खून प्रकरण खूपच गाजले होते. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरच न्यायालयाने निमसे यांचा जामीन अर्ज फेटाळून लावल्याने भाजपच्या अडचणीत वाढ झाली आहे. निमसे हे भाजपचे माजी नगरसेवक आहेत. ते महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती होते. त्यामुळे त्यांना अटक करण्यास पोलिसांकडून चालढकल केली जात असल्याचा आरोप विरोधी पक्षांकडून केला जात होता. या प्रकरणी वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना ठाकरे गटाने पोलीस आयुक्तांची भेट घेऊन निमसे यांना अटक करण्याची मागणी केली होती. दोन दिवसात अटक करण्याचे आश्वासनही आयुक्तांनी दिले होते. तरीही निमसे यांना अटक करण्यात आली नव्हती. गेल्या महिन्यात किरकोळ कारणावरून निमसे आणि त्यांचे सहकारी व धोत्रे परिवार यांच्यात वाद झाला होता. हा वाद प्रचंड हाणामारीत होऊन त्यात राहुल धोत्रे यांचा खून झाला हित. या खून प्रकरणामुळे अवघे शहर घुसळून निघाले होते.

एवढी गंभीर घटना घडूनही पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले नसल्याची खमंग चर्चा रंगली होती. सत्ताधारी भाजपकडून निमसे यांना अभय दिले जात असल्याचा आरोप केला जात होता. ही घटना घडली तेव्हापासून उद्धव निमसे फरार झाले होते. त्यांनी अटकपूर्व जामिनासाठी जिल्हा न्यायालयात अर्ज केला होता; पण न्यायालयाने त्यांचा अर्ज फेटाळला होता. त्यानंतर निमसे यांनी उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. उच्च न्यायालयानेही निमसे यांचा अर्ज फेटाळून लावला.

याशिवाय पोलिसांवरही ताशेरे ओढले आहे. न्यायालयाच्या दणक्यानंतर पोलीस आता निमसे यांना अटक करण्याची कारवाही करतील, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहे. भाजप निमसे यांना पाठीशी घालण्याचे काम करीत असल्याचा आरोप विरोधी मंडळी करीत आहे.

## लॅब कर्मचाऱ्यास लुटणाऱ्या तिघांना अटक एक फरार

**वावी ।** सिन्नर शिर्डी महामार्गावर मिरगाव फाट्याजवळ रात्रीच्या वेळी लॅब कर्मचाऱ्यास मारहाण करून त्यांच्या जवळील रोख पंधरा हजार रुपये व त्यास मारहाण करून संशितांनी बर जाऊ वेगात शिर्डीच्या दिशेने पलाईन केले होते. सुधाकर सोपान वक्ते(३५) हा वावी येथे लॅब टेक्निशियनचे काम आटोपून जेऊर कुंभारी (कोपरगाव) येथे आपल्या घरी रात्री ८ वाजेच्या सुमारास जात असताना मारहाण झाली होती त्या संशयतांना आठ दिवसाच्या आत वावी पोलिसांनी मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले यामध्ये महेश बाबुराव सोळके (२४) नाशिक धीरज नंदकिशोर गुंडगळ (२४) नाशिक भारत भागवत बांगर -२४. बीड ह मु नाशिकया तिघांना नासिक येथे वेगवेगळ्या ठिकाणी सापळा रचून पोलीस उपनिरीक्षक विजय कोठावळे यांच्या पथकाने अटक केली असून त्यातील चौथा आरोपी अमर राकेश वळवी नवापूर नंदुरबार हा मात्र फरार असून त्याचाही कसून शोध पोलीस घेत आहे संशोतांनी पोलिसांना सुरुवातीला उडवा उडवी चे उत्तरे दिले मात्र पॉलिसी खात्यात दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली यामध्ये वरील आरोपी नाशिक येथे लॅब टेक्निशियन चे काम करत असून कुणाच्या सांगण्यावरून कृत्य केले की सराईत गुन्हेगार आहेत याचा पोलीस शोध घेत आहे मात्र दि.४ रोजी सिन्नर न्यायालयात आरोपींना हजर केले असता त्यांना पुन्हा एक दिवसाची पोलीस कस्टडी देण्यात आली आहे.

# सटाण्यात शिवसेनेचा जाहीर इशारा; जनसुरक्षा कायदा तात्काळ रद्द करा!

**सटाणा ।** महाराष्ट्र सरकारने लागू केलेला जनसुरक्षा कायदा तात्काळ रद्द करावा, या मागणीसाठी शिवसेना (उबाठा) गटाच्या वतीने बुधवारी सटाणा येथे तहसीलदार कार्यालयासमोर काळे ध्वज फडकावून तीव्र निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनाचे नेतृत्व जेष्ठ नेते लालचंद सोनवणे व शहरप्रमुख रवींद्र सोनवणे यांनी केले. यावेळी तहसीलदार तसेच पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले. आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणा देत कायद्याचा निषेध व्यक्त केला. निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रात लागू करण्यात आलेला जनसुरक्षा कायदा हा लोकशाही व संविधानाने नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांवर गदा आणणारा आहे. लोकशाहीत जनतेला आवाज उठवण्यासाठी आंदोलन, मोर्चे, उपोषण यांसारखी शांततामय मार्गाची शस्त्रे उपलब्ध आहेत. परंतु सरकारने हा कायदा लागू करून लोकशाहीची पायमल्ली केली असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्य व वैयक्तिक हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे शिवसेना (उबाठा) गटाने




या कायद्याचा जाहीर निषेध नोंदविला आहे. शिवसेना उबाठाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, "महाराष्ट्र सरकारने हा कायदा लवकरात लवकर मागे घ्यावा, अन्यथा उग्र आंदोलन उभारले जाईल." या आंदोलनात अनिल सोनवणे, अमोल पगार, शरद शेवाळे, राजेंद्र खानकरी, राजनसिंग चौधरी, सुमित सोनवणे, सुरेश पगार, संदीप सोनवणे, पंकज ठाकूर, सुनील गायकवाड, मंगेश जाधव, देविदास सोनवणे, शेखर परदेशी, मनोहर शिंदे, शशिकांत सोनवणे, सुधीर सोनवणे, सुनील गायके, मोसिन शेख, रवींद्र सोनवणे, मोसिन शहा, मंगलसिंग जोहरी, अशोक खैरनार यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक सहभागी झाले होते. तहसीलदारांनी निवेदन स्वीकारून भावना वरिष्ठांपर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले. तर पोलीस निरीक्षक योगेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण परिसरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान, शहरप्रमुख रवींद्र सोनवणे यांनी सांगितले की, "जनसुरक्षा कायदा हा गोरगरीब आणि सर्वसामान्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा जुलमी कायदा आहे. आंदोलन, मोर्चे व अभिव्यक्ती हक्कांवर निर्बंध लादणारा हा कायदा तात्काळ मागे घेतला नाही, तर शिवसेना (उबाठा) कडून पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल.

## महत्त्वाचे

### आपली आपुलकी संस्थेतर्फे गुणवंत शिक्षकांचा सन्मान

**त्र्यंबकेश्वर ।** नाशिक जिल्हयाच्या ग्रामीण भागात आरोग्य शिक्षण व पाणी या मुलभूत गरजांवर सामाजिक कार्य करणाऱ्या आपूलकी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने ग्रामीण




भागात ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या २२ शिक्षक व एक खेळाडू यांना गुणवंत पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. संत जनार्दन स्वामी आश्रम सभागृहात रविवारी (दि.७ सप्टें.) रोजी नाशिक विभागाचे अंमली पदार्थ विरोधी पथकाचे उपअधिक्षक गुलाब पाटील यांचे हस्ते गुणवंत शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. निवृत्त निरीक्षक शंकरराव गरुड यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भारत सेवा आश्रम संघाचे स्वामी परिपूर्णानंद , कार्यक्रमाचे अध्यक्ष एसएमबीटी चे डॉ. दिलीप गरुड होते. संस्थाचालक सुभाष देशमूख , विजय राऊत, लतिका गरुड आदी मान्यवर उपस्थित होते. शिरसगाव( ता. त्र्यंबकेश्वर) या अतिदुर्गम भागातील आश्रमशाळेत शिक्षण घेणारी सानिका चौधरी हिचा विशेष क्रीडा नैपुण्य पुरस्कार प्रदान करून सन्मान करण्यात आला. आपली आपुलकी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष खंडेराव डावरे यांनी प्रास्तविक तर सहसचिव रामदास शिंदे यांनी सुत्रसंचलन व आभार मानले. यावेळी उपाध्यक्ष जयवंत राऊत, सचिव शांताराम गायकवाड, खजिनदार कविता डावरे, संचालक बलराम माचरेकर, सतिश चितोडकर, राकेश दळवी विष्णूपंथ हगवणे, ऋणानुबंध अकॅडमीचे अध्यक्ष दूर्वादास गायकवाड सुभाष जगदाळे यांचे सह जिल्हयातीत गुणवंत शिक्षक पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

### आडगाव पोलिसांच्या सतर्कतेने दरोड्याचा डाव उधळला

**नाशिक ।** आडगाव शिवारात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या चौघांपैकी तीन जण अंधाराचा फायदा घेऊन पळून जाण्यात यशस्वी ठरले असून, पोलिसांनी एकाच्या ताब्यातून सुमारे सव्वातीन लाख रुपयांचे दरोड्याचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे. आडगाव पोलीस ठाण्याचे पथक रात्रीची गस्त घालत होते. पहाटे तीन वाजेच्या सुमारास आडगाव शिवारातील वाढवणे कन्स्ट्रक्शन्स ॲण्ड इंजिनिअरिंगसमोर आरोपी समीर प्रमोद पाटील (वय २९, रा. हनुमाननगर, मलकापूर, जि. बुलढाणा), पवन पाटोळ, (रा. छत्रपती संभाजीनगर) व त्यांचे इतर तीन साथीदार हे जबरी चोरी किंवा दरोड्याची पूर्वतयारी करून दरोडा टाकण्याच्या तयारीत होते. त्यावेळी पोलीस पथकाने त्यांच्या ताब्यातून निळ्या रंगाची बॅग, मिरची पावडर, हॅण्डग्लोव्हज, दोरी, चॉपर, लोखंडी फायटर, गावठी कट्टा, एक पितळी काडतूस, सुझुकी कंपनीची मोटारसायकल, टीव्हीएस कंपनीची अपाची मोटारसायकल असे सुमारे ३ लाख ११ हजार ५०० रुपये किमतीचे दरोडा टाकण्याचे साहित्य त्यांच्या ताब्यात मिळून आले, तसेच त्यांच्या पळून गेलेल्या चार साथीदारांबाबत विचारपूस करता एकाचे नाव पवन पाटोळ (रा. छत्रपती संभाजीनगर) असे सांगितले. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदाळे करीत आहेत.

# वाढदिवसाच्या निमित्ताने एक तरी झाड लावावे : प्राचार्य जाधव

## शाळेत लावलेल्या वडाच्या झाडाचा वाढदिवस साजरा





**नाशिक ।** पर्यावरणाचे जतन करण्यासाठी व समतोल राखण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी दरवर्षी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने शाळेत किंवा परिसरात एक तरी झाड लावून त्याची जोपासना करणे गरजेचे आहे.असे आवाहन प्राचार्य व्ही.जे. जाधव यांनी केले.

आपल्या शाळेतील वडाचे झाडाचा वाढदिवस साजरा करताना विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना त्यांनी आवाहन केले. बी. के.कावळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजाराम नगर कादवा कारखाना येथे सुरेश सलादे यांनी आठवण म्हणून दोन वर्षापूर्वी लावलेल्या वडाच्या झाडाचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी जे विद्यार्थी पाचवी इयत्तेत शिकत होते ते आज सातवीला आहे. त्या सर्व विद्यार्थी यांनी आज दोन वर्षापूर्वी लावलेल्या वडाच्या झाडाला औक्षण केले आणि दुसऱ्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य विलास जाधव, पर्यवेक्षिका श्रीमती कावळे टी.पी., व्ही.जे.दिघे,श्रीमती एस.आर. डोखळे, श्रीमती जाधव एस.एस., प्रदीप नवले आदी उपस्थितीत होते. विद्यार्थ्यांना पर्यावरणाची जाणीव व्हावी.वृक्षारोपणचे महत्व कळावे व त्यांच्या निसर्गाचे संस्कार व्हावे म्हणून लावलेल्या झाडाचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी गौरी कावळे, अंजली मंगेश काळोगे यांनी मनोगत व्यक्त केले. सर्व विद्यार्थी यांनी वडाच्या झाडाला शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य जाधव यांनी मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, पर्यावरण हे जोपासले पाहिजे. झाडे ही नुसती लावून चालणार नाही तर ते जोपासले पाहिजे. झाडे ही जगवा. ही चळवळ झाली पाहिजे. विद्यार्थी यांनी आपल्या वाढदिवस निमित्त झाडे लावली पाहिजे. यावेळी विद्यार्थी यांनी झाडाचे नाव सिया ठेवले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सुरेश सलादे यांनी केले.

> झाडे ही निसर्गाची अमूल्य देणगी आहे. आपण झाडे जोपासली पाहिजे. वाढदिवस निमित्ताने प्रत्येक विद्यार्थी यांनी झाडे लावली पाहिजे .एक मुल एक झाड ही चळवळ व्हावी.
> – **सुरेश सलादे**

> आम्ही पाचवीला असताना हे झाड लावले होते. आज त्याचा दुसरा वाढ दिवस आम्ही साजरा केला.
> – **मनस्वी वडजे**

# वावी विकास सोसायटी व्हा. चेअरमनपदी खाटेकर



**वावी ।** वावी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीमध्ये सरपंच विजय काटे यांच्या नेतृत्वाखाली निवडून आलेल्या सदस्यांना पदाची संधी मिळावी यासाठी व्हा चेअरमन रेखा कैलास काळोखे यांनी आपला पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर सोसायटी कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी सुदर्शन तांदळे व सहाय्यक बाळकृष्ण सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व चेअरमन संदीप भोसले यांच्या उपस्थितीत निर्धारित वेळेत चेअरमन पदासाठी बाळासाहेब पुंजाजी खाटेकर यांना सूचक म्हणून सदस्य कैलास दशरथ जाजू व अनुमोदन अशोक किसन वेलजाळी यांनी स्वाक्षरी केली.

निर्धारित वेळेत एकमेव अर्ज आल्याने बाळासाहेब पुंजाजी खाटेकडी यांची व्हा चेअरमन म्हणून निवड घोषित करण्यात आली यावेळी संचालक अशोक ताजने अर्जुन काटे भाऊसाहेब वेलजाळी दत्तात्रेय नवले लता पुंजाहरी काटे आदी संचालक उपस्थित होते व्हा चेअरमन काटेकर यांचा सरपंच विजय काटे विजय सोमानी माऊली खाटेकर सुदाम मराळे सुधाकर नवले आदींनी सत्कार केला.

## विद्यार्थिनीं विषबाधा प्रकरणाचा तपास अद्याप गुलदस्त्यात

**नाशिक ।** कळवण तालुक्यातील कनाशी आश्रमशाळेतील विद्यार्थिनीना विषबाधा नेमकी कशामुळे झाली, या निष्कर्षापर्यंत संबंधित यंत्रणा अजूनही पोहचु शकली नाही,यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी अन्नातून विषबाधा किंवा दूषित पाण्यामुळे असा प्रकार झाल्याचा संशय आहे. विद्यार्थिनींवर कनाशी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करून त्यातील काही विद्यार्थिनींना आश्रमशाळेत पाठविण्यात आले आहे. परंतु असे असले तरी विषबाधा नेमकी कशामुळे झाली, याचा उलगडा अद्याप होऊ शकलेला नाही. घटनेच्या दुसऱ्या दिवशी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी दूषित आणि निकृष्ट दर्जाचे अन्न खाण्यात आल्याने नाही तर, व्हायरल इन्फेकशन मुळेच विषबाधा झाल्याचे छातीठोकपने सांगितले आहे. सखोल चौकशी न करता मंत्री असा दावा कसा करू शकता? असा प्रश्न उपस्थिती करत पालकवर्गाने मंत्री उईके यांच्याकडे घटनेची सखोल चौकशीची मागणी केली होती. परंतु पाच दिवस उलटूनही या घटनेची संपूर्ण चौकशी होऊ शकलेली नाही.

# कारवाईवरून जिल्हा परिषदेत टोलवाटोलवी




## लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याच्या मुद्यावरून दोन विभागांनी जबाबदारी झटकली

**नाशिक ।** जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांनीही लाडकी बहिण योजनेचा लाभ घेतल्याची माहिती सरकारी पातळीवर पोहचली आणि ग्रामविकास विभागाने थेट संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत पत्र काढले असून आठ महिलांवर कारवाई करण्यावरून मात्र प्रशासनातील दोन विभागांमध्ये टोलवाटोलवी सुरू आहे.

महायुती सरकारने निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहिण योजना अस्तित्वात आणली. चारचाकी, घर असलेल्या महिलाही योजनेच्या लाभार्थी ठरल्या आहेत. एवढेच नाही तर, राज्यभरात जिल्हा परिषदेच्या १,१८३ कर्मचाऱ्यांनीही योजनेचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यानंतर ग्रामविकास विभागाने कडक पावले उचलली. संबंधित महिला कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. नाशिक जिल्हा परिषदेत आठ महिलांनी लाभ घेतल्याचे स्पष्ट झाल्यानंतर महिला व बालविकास विभागाने संबंधित महिला कर्मचाऱ्यांची नावे आणि त्या कार्यरत असलेल्या विभागाची माहिती सामान्य प्रशासन विभागाला दिली आहे. माहिती प्राप्त झाली असल्याने संबंधित महिला कर्मचाऱ्यांवर कारवाई होणे अपेक्षित आहे. मात्र यात दोन विभागांची टोलवाटोलवी सुरू आहे. आम्हीच महिला व बालविकास विभागाला संबंधित आठ महिलांची माहिती महिला व बालविकास विभागाला दिली असून त्यांची नावे आणि विभाग कळविण्यास सांगिल्याचे सामान्य प्रशासन विभागाचे म्हणणे आहे. त्यामुळे कारवाईचा मूळ मुद्दा बाजूलाच राहिला आहे.

# वावीच्या २० विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय निवड; गोल्ड मेडलने ४० जण सन्मानित



**वावी ।** नाशिक येथील आय जीनियस अकॅडमीच्या माध्यमातून जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात वावीच्या ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यात महाराष्ट्रातील वेगवेगळे विभागातून सहा हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये वीस मिनिटात गणित विषयात शंभर अचूक प्रश्न सोडवणे हा महत्त्वाचा विषय होता. त्यात वावीच्या वीस विद्यार्थी अव्वल आल्याने त्यांचा राज्यस्तरीय स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. यावेळी आय जीनियस अबॅकस अकॅडमीच्या वतीने वावी येथे शिक्षक दिनाचे औचित्य साधून वावी क्लासच्या संचालिका अर्चना शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा वावी येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले सार्वजनिक हॉलमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून वावीचे सरपंच विजय काटे, स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष रामनाथ कर्पे, विघ्नहर्ता प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गणेश वेलजाळी, प्रा. कारभारी वेलजाळी, पत्रकार संतोष भोपी आदींच्या प्रमुख उपस्थितीत हा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी वावी सारख्या छोट्या गावातील विद्यार्थी राज्यपर्यंत मजल मारू शकतात. केवळ बुद्धीच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. सहा हजार विद्यार्थ्यांमध्ये राज्यस्तरीय स्पर्धेत यश संपादन करणे ही वावी गावासाठी अभिमानाची बाब आहे आणि असे विद्यार्थी वावी क्लासच्या शिक्षिका अर्चना शेलार यांच्या माध्यमातून घडतात असेही वेलजाळी यावेळी बोलत होते. संचालिका नीता पवार व ट्रेनिंग हेड अनिता पवार यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सहशिक्षिका रोहिणी शिंदे, अनुजा भटकर, श्रुतिका मोरे, मानसी थेटे, मयुरी टाक आदींच्या सहकार्याने हा कार्यक्रम या ठिकाणी यशस्वी पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी देसाई यांनी केले, तर आभार अर्चना शेलार यांनी व्यक्त केले.




# वेगाने फैलावतोय चिकुनगुनिया



व्याधी विचार
डॉ. संदीप नाईकवाडे

सुमारे २० वर्षांपूर्वी जगभरात कहर करणारा हा विषाणू पुन्हा एकदा परतला आहे. या विषाणूचे नाव चिकुनगुनिया आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये चिकुनगुनिया विषाणू रियुनियन, मेयोट आणि मॉरिशस सारख्या बेटांवरून मादागास्कर, सोमालिया आणि केनियासारख्या आफ्रिकन देशांमध्ये पसरला आहे. आता तो चीनमध्ये वेगाने पसरत आहे.

चीनच्या ग्वांगडोंग प्रांतात चिकुनगुणिया विषाणूचा प्रकोप वाढत असून, जुलैपासून आतापर्यंत सात हजाराहून अधिक रुग्ण आढळले आहेत. फोशान शहर सर्वाधिक प्रभावित असून, या ठिकाणी कोविड काळातील उपाययोजनांची आठवण करणारी पावले उचलली जात आहेत. फोशानमध्ये चिकुनगुनिया च्या रुग्णांना हॉस्पिटलमध्येच ठेवले जात असून त्यांच्यासाठी खास जाळी लावून डासांपासून संरक्षण केले जात आहे. रुग्णांना आठ दिवसांनंतर कवा रिपोर्ट निगेटिव्ह आल्यानंतरच डिस्चार्ज दिला जातो. चिकुनगुनिया विषाणू संक्रमित डासांच्या चाव्याने पसरणारा आजार आहे. यामुळे ताप, पुरळ आणि तीव्र सांधेदुखी होते, जी काही वेळा महिन्यांनंतरही थांबत नाही.

**जागतिक आरोग्य संघटनेचा इशारा**

जागतिक आरोग्य संघटनेने इशारा दिला होता, की चिकुनगुनिया आशियाई देशांपासून युरोपपर्यंत कहर करू शकतो. सध्या आशिया आणि युरोपमधील अनेक देशांमध्ये त्याचे रुग्ण सतत वाढत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले होते, की सध्या ११९ देशांमधील सुमारे ५६० कोटी लोकांना चिकुनगुनिया संसर्गाचा धोका आहे. दरवर्षी केवळ चीनमध्येच नाही, तर भारतातही चिकुनगुनियाचे रुग्ण आढळतात. पावसाळ्यात डास वाढतात आणि चिकनगुनियाचा विषाणूदेखील अधिक पसरू लागतो. २००५ मध्ये चिकुनगुनियाने साथीचे रूप धारण केले आणि नंतर हा आजार हद महासागरातील लहान बेटांपासून सुरू झाला आणि पाच लाखांहून अधिक लोकांमध्ये पसरला. क्वचित प्रसंगी, चिकुनगुनिया अपंगत्व देऊ शकतो.

**ग्वांगडोंगमध्ये गंभीर स्थिती**

फोशानसह ग्वांगडोंगमधील बाराहून अधिक शहरांमध्ये चिकुनगुनियाचे रुग्ण आढळले आहेत. एकाच आठवड्यातच तीन हजारांहून अधिक नवीन रुग्ण नोंदवले गेले. याशिवाय, हाँगकाँगमध्ये पहिला रुग्ण सापडला आहे.

# कबुतरांपासून जीवघेणा आजार ?

मुंबईत कबुतरखान्याचा विषय चांगलाच तापला. उच्च न्यायालयाने मुंबईतील कबुतरखाने बंद करण्याचे आदेश दिले. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मुंबई महापालिकेने सार्वजनिक ठिकाणी कबुतरांना अन्न घालण्यावर बंदी घालण्यात आली. कबुतरांच्या वाढत्या संख्येमुळे झपाट्याने आजार पसरत असल्याचे मत उच्च न्यायालयाने मांडले.

गेल्या अनेक महिन्यांपासून मुंबईतील दादरमधील कबुतरखाना हटवण्याची मागणी होत आहे. हा कबुतरखाना दादर रेल्वे स्थानकापासून काही अंतरावरच आहे. हा कबुतरखाना दादरची ओळख बनला होता; मात्र या ठिकाणी येणाऱ्या कबुतरांच्या प्रचंड संख्येमुळे या परिसरात वेगाने आजार पसरत असल्याचे उघड झाले होते. त्यामुळे स्थानिकांनी कबुतरखाना बंद करण्याची मागणी सातत्याने धरुन ठेवली होती.

**कबुतरांमुळे कोणते आजार होऊ शकतात?**

कबुतरांमुळे विविध आजार होऊ शकतात. यामध्ये श्वासाचे आजार, त्वचेचे आजार आणि पचनसंस्थेशी संबंधित आजार यांचा समावेश आहे. कबुतरांच्या विष्ठेतून आणि पिसातून पसरणाऱ्या जीवाणू, विषाणू आणि बुरशीमुळे हे आजार होतात. कबुतरांची विष्ठा आणि पिसांमुळे अनेक नागरिकांना श्वसनाच्या व्याधी जडल्या होत्या. कबुतराच्या विष्ठेशी संबंधित रोगांमध्ये 'क्रिप्टोकोकोसिस', 'हिस्टोप्लाज्मोसिस' आणि 'सिटाकोसिस' यांचा समावेश होतो. विष्ठा साफ करताना तयार होणाऱ्या धुळीमध्ये श्वास घेतल्याने या आजारांची लागण होऊ शकते. कबुतरांच्या विष्ठेत अस्परजिलस बुरशी आढळून येते. यामुळे लर्जी होऊ शकते. तसेच कबुतरांमुळे अस्थमादेखील होण्याची शक्यता असते. कबुतरांमुळे 'क्रिप्टोकोकोसिस', 'हिस्टोप्लाज्मोसिस,' 'सायटाकोसिस', 'साल्मोनेलोसिस', 'एव्हीयन माइट इन्फेस्टेशन' आणि 'टॉक्सोप्लाज्मोसिस' सारखे आजारही होण्याची शक्यता आहे.

**कबुतरांमुळे होणारे आजार**



घ्या काळजी
डॉ. प्रसन्न नेने

**क्रिप्टोकोकोसिस :** 'क्रिप्टोकोकोसिस' एक बुरशीजन्य आजार आहे. तो कबुतरांच्या विष्ठेतून पसरतो.

**हिस्टोप्लास्मोसिस:** 'हिस्टोप्लास्मोसिस'देखील एक बुरशीजन्य आजार आहे, तो ही कबुतरांच्या विष्ठेतून पसरतो.

**सिताकोसिस :** 'सिटाकोसिस' हा एक जीवाणूजन्य आजार आहे. तो कबुतरांच्या संपर्कात आल्याने होऊ शकतो.

**ऑर्निथोसिस:** 'ऑर्निथोसिस' हा एक जीवाणूजन्य आजार आहे. तो कबुतरांच्या विष्ठेतून आणि पिसातून पसरतो.

**लर्जी :** कबुतरांच्या संपर्कात आल्याने लर्जी होऊ शकते. त्यात श्वासोच्छ्वास आणि त्वचेच्या लर्जीचा समावेश आहे.

**फुफ्फुसाचे आजार :** कबुतरांच्या विष्ठेतील धुळीमुळे फुफ्फुसाचे आजार होऊ शकतात.

# डास चावताहेत?

विकार



ऋतूबदलाच्या काळात डास मोठ्या प्रमाणावर सक्रिय होतात. प्रजननाच्या काळात डासांच्या संख्येत प्रचंड वाढ होते. डासांमुळे डेंग्यू, मलेरियासारख्या विकारांचा धोका बळावतो. डास चावल्यानंतर शरीरावर व्रण उठतात. बऱ्याचजणांची त्वचा संवेदनशील असते. अशा लोकांना डास कवा किटकदंशानंतर बराच त्रास होतो. अंगावर पुरळ उठतं. अशा वेळी डासविरोधी क्रीम्सचा वापर करायचा नसेल तर नैसर्गिक उपाय मदतीला येऊ शकतो. केळ्याच्या सालीचा वापर करून तुम्ही डास चावल्यामुळे होणारा त्रास कमी करू शकता.

* केळ्याच्या सालीत दाह कमी करणारे गुणधर्म असतात. त्यामुळे डास चावल्यानंतर उठणाऱ्या लालसर पुरळाची तीव्रता कमी होऊ शकते. केळ्याची साल, गुलाबपाणी आणि बर्फ यांचा एकत्रित वापर करून तुम्ही बरेच लाभ मिळवू शकता. यासाठी केळ्याची साल घ्या. त्यावरचा पांढरा भाग खरवडून काढा. कुस्करून घ्या. त्यात गुलाबपाणी घाला. हे मिश्रण एकजीव करा. याची जाडसर पेस्ट तयार व्हायला हवी. ही पेस्ट पुरळ उठलेल्या भागावर लावा. यानंतर बर्फाचे तुकडे एका कापडात बांधून घ्या. हा बर्फ पेस्ट लावलेल्या भागावर लावा. साधारण पंधरा मिनिटांनी हा उपाय करत राहा. मग पेस्ट लावलेला भाग पाण्याने धुवून टाका. कोरडा करा.

* केळ्याचं साल आणि ग्लिसरीन यांच्या मिश्रणामुळेही तुम्हाला आराम मिळू शकेल. आधीप्रमाणे केळ्याच्या सालीतला पांढरा भाग काढून घ्या.

# नैराश्य दूर करण्यासाठी मांजर पाळा!

बऱ्याच लोकांना मांजरे पाळायला आवडतात. आता मांजरांचा वापर अल्झायमर आणि डिमेंशियाच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी केला जाऊ शकतो. अलीकडेच एक अभ्यास करण्यात आला. त्यात दिसून आले, की म ांजरांमधील डिमेंशिया हा आजार मानवांमध्ये होणाऱ्या अल्झायमर आजारासारखाच आहे. अशा परिस्थितीत, शास्त्रज्ञांचा विश्वास आहे, की मांजरे अल्झायमर आणि डिमेंशियाच्या उपचारात खूप उपयुक्त ठरू शकतात.



आयुर्वेद
डॉ. महेश दळे

**डिमेंशिया आणि अल्झायमरशी मांजरांचा संबंध**

हे संशोधन ब्रिटनमधील एडिनबर्ग विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी केले आहे. त्यांनी असे निरीक्षण केले की डिमेंशिया असलेल्या मांजरांच्या मेंदूमध्ये एक विशेष प्रकारचे विषारी प्रथिन जमा होते, ज्याला अमायलॉइड-बीटा म्हणतात. हे प्रथिन मानवांमध्ये अल्झायमर आजाराचे मुख्य कारण मानले जाते. 'युरोपीयन जर्नल ऑफ न्यूरोसायन्स'मध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासात असे म्हटले आहे की मांजर आणि मानवांच्या या आजारात अनेक समानता आहेत. शास्त्रज्ञांनी असे निरीक्षण केले आहे, की वृद्ध मांजरांना डिमेंशिया होतो, तेव्हा त्यांचे वर्तन बदलते. यामुळे ते वारंवार म्याऊ करतात. त्या गोंधळलेल्या स्थितीत दिसतात. त्याच वेळी त्यांची झोपदेखील वारंवार खंडित होते. ही सर्व लक्षणे मानवांमध्ये होणाऱ्या अल्झायमर रोगासारखीच आहेत. अशा परिस्थितीत, शास्त्रज्ञांना वाटते, की मांजरांचा अभ्यास करून अल्झायमर रोग चांगल्या प्रकारे समजू शकतो.

**संशोधनात काय केले ?**

या अभ्यासासाठी, शास्त्रज्ञांनी २५ मृत मांजरांच्या मेंदूवर संशोधन केले. यापैकी काही मांजरे डिमेंशियाने ग्रस्त होत्या. त्यांनी एका शक्तिशाली सूक्ष्मदर्शकाच्या मदतीने मांजरांच्या मेंदूची तपासणी केली आणि असे आढळले, की वृद्ध आणि डिमेंशियाने ग्रस्त मांजरांच्या मेंदूमध्ये अमायलॉइड-बीटा प्रथिनांचा साठा आहे. हा साठा 'सायनॅप्स'मध्ये दिसून आला. सायनॅप्स मेंदूच्या पेशींमध्ये संदेश पाठवण्याचे काम करतात. ते निरोगी मनासाठी खूप महत्वाचे आहेत. त्यांच्यामध्ये अमायलॉइड-बीटा जमा होतो, तेव्हा ते योग्यरित्या कार्य करू शकत नाहीत. यामुळे स्मरणशक्ती आणि विचार करण्याची क्षमता कमी होते. अल्झायमर रोगातही हीच समस्या दिसून येते.

# मित्र जोडा, आजार पळवा!



कुठे चुकतो आपण?
डॉ. कुंदन गायकवाड

अनेकांच्या 'सोशल मीडिया' अकाउंटवर कमेंट्स आणि लाईक्सचा वर्षाव असतो, त्यांच्या मित्रांची, फॉलोअर्सची यादी मोठी असते. असे असले अनेकजण अडचणीच्या काळात स्वतःला एकटे पडल्याचे अनुभवतात. 'न्यूज कॉर्प'च्या 'ग्रोथ डिस्टिलरी' आणि 'मेडिबँक'च्या नव्या अभ्यासात हे भयावह वास्तव समोर आले आहे. त्यामुळे डिजिटल गर्दीमागे लपलेले एकटेपण उघड झाले आहे. या अभ्यासानुसार, मानसिक स्थिती चांगली असणाऱ्यांकडे सरासरी पाच कवा त्याहून जास्त मित्र असल्याचे स्पष्ट झाले आहे; पण मानसिकदृष्ट्या संघर्ष करत असलेल्यांकडे फक्त तीनच मित्र असतात. ही लहानशी वाटणारी दोन मित्रांची तफावत मोठा परिणाम करणारी ठरते. त्यामुळे माणूस 'मी परिस्थिती हाताळू शकतो' या भावनेप-ासून 'कोणाला त्रास नको, म्हणून मी शांत राहतो' या अवस्थेत पोहोचतो.

**सोबत असूनही दूर का वाटते?**

आजचे 'सोशल लाइफ' बिझी असले, तरे ते वरवरचे आहे. अनेकजण इव्हेंटला जातात, ग्रुप चॅटमध्ये सक्रिय असतात, त्यांचे शेकडो मित्र असतात; पण एखादे संकट आले, की अशा व्यक्ती कुणालाही फोन करणे टाळतात. अशा वेळी आपण हक्काने आपली समस्या सांगू शकू असे मित्र आपल्याकडे नसतात. आपली समस्या सांगून आपण इतरांवर ओझे होऊ नये, किंवा त्यांना आपण दुर्बल असल्याचे दिसू नये म्हणून टाळण्याचा प्रयत्न करतो. अशा तणावपूर्ण परिस्थितीमध्ये आपल्याला कुणी काही विचारलेच तर 'फक्त थोडे थकलोय' कवा 'फार बिझी असतो' असे सांगून आपण वेळ मारून नेतो.

**खरे नाते काय असते?**

खरे नाते म्हणजे ५० कवा १०० मित्र असणे नव्हे, तर एखादी अशी व्यक्ती, जी निःसंकोचपणे तुमचा फोन उचलेल, तुमच्या मदतीला येईल. त्याचप्रमाणे तुम्हीही त्याच्यासाठी कधीही, वेळ न पाहता मदतीसाठी पोहोचाल.

# मधुमेहींसाठी पेयांचे पर्याय

काय खावं?

बऱ्याच पेयांमध्ये भरपूर साखर असते. त्यामुळे मधुमेहींना काही पेयं टाळावी लागतात. त्यांना बरेचदा पाण्यावरच समाधान मानावं लागतं. पण मधुमेहींसाठी आरोग्यदायी पेयांचे काही पर्याय आहेत. त्याविषयी...



* मधुमेहग्रस्तांना भाज्यांचे रस पिता येतील. पालक, गाजर, टोमॅटो यांचे रस खूपच आरोग्यदायी असतात. यातून आवश्यक ते पोषक घटकही मिळतात. आवडीच्या भाज्यांचे रसही पिता येतील.

* मधुमेही कॉफी पिऊ शकतात. कॉफीमुळे मधुमेह होण्याची शक्यता कमी होते, असं काही अभ्यासांमधून सम ेर आलं आहे. अर्थात कॉफी मर्यादित प्रमाणात प्यायला हवी. शिवाय त्यात साखरेचं प्रमाणही कमी असावं.

* हर्बल टी हा सुद्धा एक चांगला पर्याय आहे. बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे हर्बल टी मिळतात. या चहामुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात रहायला मदत होते. डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य तो हर्बल टी प्या.

* मधुमेहींनी आहारात दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करायला हरकत नाही. त्यांनी कमी कॅलरी आणि फॅट्युक्त दूध प्यावं. डॉक्टरांच्या सल्ल्याने दुधाचं प्रमाण ठरवता येईल.

# दुर्मिळ प्रकारचा कॅन्सर




आरोग्यवेध

मध्यंतरी इराकच्या एक महिलेला अत्यंत दुर्मिळ प्रकारच्या कर्करोगाचं निदान झालं. या कर्करोगाबाबत सर्वसामान्यांना फारशी माहिती नाही. अगदी थोडं अंतर चालल्यानंतरही तिला धाप लागत असे. यानंतर तिची तपासणी करण्यात आली आणि 'मेसोथेलिओमा' नामक कर्करोगाचं निदान झालं. इराकमधली ही महिला उपचारांसाठी भारतात आली होती. गुरूग्रामच्या रुग्णालयात या कर्करोगाचं निदान करण्यात आलं. 'मेसोथेलिओमा' हा एक प्रकारचा फुफ्फुसाचा कर्करोग आहे. हा कर्करोग फुफ्फुसाच्या संरक्षण आवरणावर पसरतो. या कर्करोगाचं निदान वेळेत होत नाही. अगदी अखेरच्या टप्प्यांमध्ये याचं निदान होतं. म्हणूनच या विकाराच्या लक्षणांकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

**लक्षणं**

कोरड्या खोकल्याची सतत येणारी उबळ, धाप लागणं, थोडंसं चालल्यानंतर श्वास घ्यायला त्रास होणं, थोडी हालचाल केल्यानंतर दमल्यासारखं वाटणं, अचानक ताप येणं कवा रात्री खूप घाम येणं, फुफ्फुसामध्ये पाणी साठणं, पोटात कवा छातीत दुखणं, सतत थकल्यासारखं वाटणं, अशी लक्षणं दिसून आल्यास रुग्णाने नियमित रक्ततपासणी तसंच फुफ्फुसाची क्ष-किरण चाचणी करून घेणं गरजेचं आहे. रक्ततपासणीद्वारे कर्करोगाचं निदान होऊ शकतं. त्यामुळे अशा लक्षणांकडे अजिबात दुर्लक्ष करू नये.

या कर्करोगाच्या प्रत्येक स्तरात वेगळी लक्षणं दिसून येतात. सुरूवातीच्या टप्प्यात खोकला येणं, श्वास घ्यायला त्रास होणं, पोटात कवा छातीत दुखणं, फुफ्फुसात पाणी साठणं अशी लक्षणं दिसतात. कर्करोग अधिक पसरल्यानंतर वेदनांची तीव्रता वाढणं, भूक मंदावणं, अचानक वजन कमी होणं, त्वचा पांढरी पडणं, गिळायला त्रास होणं, पचनशक्तीवर परिणाम होणं ही लक्षणं दिसू लागतात.

**उपचार**

या आजाराचं निदान झाल्यानंतर डॉक्टर केमोथेरपीचा सल्ला देतात. कर्करोगाच्या या प्रकारावर केमोथेरपी हाच प्रभावी उपाय ठरतो. हा आजार पूर्णपणे बरा करण्यासाठी 'हायपरथेमिक इन थोरेकिक केमोथेरपी' केली जाते. या थेरपीद्वारे छोट्यातल्या छोट्या कॅन्सर पेशी नष्ट केल्या जातात. या पेशी साध्या डोळ्यांना दिसत नाहीत. पण या थेरपीद्वारे त्या नष्ट होतात. या थेरपीसाठी विशेष उपकरणाची गरज भासते. तसंच या उपरणाच्या वापरासाठी योग्य ती सोय असणं गरजेचं असतं. आजाराच्या तीव्रतेनुसार उपचारांचा निर्णय घेतला जातो. केमोथेरपी आणि शस्त्रक्रियेव्यतिरिक्त इतर उपायांनी या आजारावर नियंत्रण मिळवता येतं. या विकाराचं निदान झाल्यानंतर योग्य आहार, क्युपंक्चर, योगा, मेडिटेशन करून नियंत्रण मिळवता येतं. किरणोत्सर्ग हा सुद्धा प्रभावी उपाय ठरू शकतो. तसंच रुग्णाचं समुपदेशनही केलं जातं.

# मेंदू खाणारा अमिबा येतोय!



नवसंशोधन
डॉ. सुनील पोटे

पोहण्याच्या पाण्यात वा आंघोळीच्या पाण्यातील एका सुक्ष्म जीवामुळे आपला जीव जाऊ शकतो, हे ऐकून विचित्र वाटेल. एका अमिबामुळे मृत्यू कसा येऊ शकतो, असा प्रश्न पडेल; परंतु केरळमध्ये घडलेल्या एका चिमुरडीच्या मृत्यूने हा मेंदू पोखणारा अमिबा चर्चेत आला आहे. या घटनेने अनेकांच्या जीवाचा थरकाप उडाला आहे. केरळमधील या मुलीचा मृत्यू मेंदू खाणाऱ्या अमिबाने झाला आहे. 'निगलेरिया फाऊलेरी' असे या अमिबाचे शास्त्रीय नाव आहे.

गेल्या अनेक वर्षांमध्ये केरळमध्ये मेंदू खाणाऱ्या अमिबाने अनेक मृत्यू झाले आहेत. हा अमिबा आपण शालेय अभ्यासक्रमात शिकलो आहोत. हा सर्वसामान्य अमिबा नाही. मायक्रोस्कोपने आपण याला पाहू शकतो. हा बहुतांशी कोमट, किंवा साचलेल्या कमी अस्वच्छ पाण्यात पैदा होतो. खास करून तलाव, सरोवर, स्वीमिंग पूल कवा स्वच्छ न केलेल्या पाण्यात हा सूक्ष्म जीव वेगाने वाढत असतो.

**'ब्रेन इटग अमिबा' काय असतो ?**

'ब्रेन इटग अमिबा'ला 'निगलेरिया फाऊलेरी' म्हटले जाते. हा एक दुर्मिळ खपूच जास्त इन्फेक्शन फैलावणारा जीव आहे. हा नाकाद्वारे मेंदूत पोहचतो. येथूनच याचा खतरनाक संसर्ग सुरू होतो. सुरुवातीला हा अमिबा नाकाच्या नसांच्या वर चढतो आणि मेंदूपर्यंत पोहचतो. तेथे मेंदूच्या पेशींना नष्ट करतो. जेव्हा अस्वच्छ पाणी नाकात जाते, तेव्हा हे इन्फेक्शन सुरू होते. खासकरून स्विमींग पूल, डबके, कवा तलावाच्या घाण पाण्यात हा अमिबा असतो.

**सुरुवातीची लक्षणे काय ?**

या आजाराची समस्या ही आहे,की सुरुवातीची लक्षणे एकदम सर्वसामान्य असतात. व्हायरल ताप आल्यावर येतात तशी लक्षणे असल्याने लोक याकडे दुर्लक्ष करतात; परंतु आजार वाढत जातो, तसेतशा रुग्णाला फिट्स येतात. रुग्ण बेशुध्द पडू शकतो आणि परिस्थिती आणखी बिकट होते. यामुळे रुग्णाला तीव्र डोकेदुखी, ताप, उल्टी, मान अखडणे आदी लक्षणे दिसतात.

## महत्त्वाचे काही...

### दीर्घायुषी व्हायचंय... कमी खा!



प्रत्येकालाच दीर्घायुषी व्हायचं आहे. दीर्घायुषी होण्यासाठी नियमित व्यायाम केला जातो, पोषक आहार घेतला जातो. यासोबतच शरीरातला दाह कमी करण्याचा प्रयत्न करायला हवा. भरपूर जगायचं असेल तर कमी खा, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. कमी कॅलरी शरीरात गेल्यास वार्धक्यात होणाऱ्या आजारांची तीव्रता कमी करता येते आणि तुम्ही अधिक काळ जगू शकता, असं संशोधकांचं म्हणणं आहे. सेल नावाच्या जर्नलमध्ये हा शोध प्रसिद्ध झाला आहे. अमेरिका आणि चीनमधल्या शास्त्रज्ञांनी याबाबत निष्कर्ष काढले आहेत. हे निष्कर्ष काढण्यासाठी उंदरांवर संशोधन करण्यात आलं. त्यासाठी वेगवेगळ्या पेशींचा अभ्यास करण्यात आला.

## डोळ्यांचं आरोग्य

### डोळे सुजतात?



कॉम्प्युटर व्हिजन सड्रोममुळे डोळ्यांवर परिणाम होतोच, शिवाय आपली उत्पादकताही कमी होऊ लागते. सध्याच्या काळात आपली नजर कॉम्प्युटर, लॅपटॉप कवा स्मार्टफोनच्या स्क्रीनवर अधिक काळ खिळलेली असते. याच कारणामुळे जगभरातल्या ६० दशलक्ष लोकांना कॉम्प्युटर व्हिजन सड्रोम जडला आहे. अंधुक दिसणं, डोळे थकणं, मान अवघडणं, सततची डोकेदुखी ही कॉम्प्युटर व्हिजन सड्रोमची लक्षणं आहेत. या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता तातडीने नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घ्या. कॉम्प्युटर व्हिजन सड्रोमचे बरेच दुष्परिणाम आहेत. त्यामुळे तातडीने उपचार घेणं गरजेचं आहे.

## जपणूक त्वचेची

### लाभ मॉईश्चरायजरचे

तेलकट त्वचेवर मॉईश्चरायजर लावणं गरजेचं असतं का, असा प्रश्न अगदी सहज उपस्थित होतो. मात्र प्रत्येक प्रकारच्या त्वचेला मॉईश्चरायजरची गरज असते, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. त्वचा कोरडी पडल्यास बरेच आजार होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी मॉईश्चरायजरचा वापर करायला हवा. मॉईश्चरायजरमुळे त्वचेतला ओलावा टिकून राहतो. त्वचेला थेट पाणी मिळतं. त्वचा मुलायम राहते. मॉईश्चरायजरमुळे त्वचेवर मऊ थर तयार होतो. त्यामुळे त्याचा वापर करायला हवा.



## आजीबाईंचा बटवा

### बेदाणे भिजवलेलं पाणी प्यायल्याने...



बेदाणे भिजवलेलं पाणी आरोग्यासाठी खूप लाभदायी आहे. सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी बेदाणे भिजवलेलं पाणी प्यायला हवं. या पाण्यात बरेच पोषक घटक आणि जीवनसत्त्वं असतात. या पाण्याच्या नियमित सेवनामुळे शरीरातले विषारी घटक बाहेर टाकले जातात. साधारण आठवडाभर या पाण्याचं सेवन करत राहिल्यामुळे हृदयाचं आरोग्य सुधारतं. यासोबतच यकृतही स्वच्छ होतं. तसंच त्याची कार्यक्षमताही वाढते. यासाठी दोन कप पाण्यात १५० ग्रॅम बेदाणे भिजवून ठेवा. बेदाणे भिजवण्याआधी पाणी उकळून घ्या. बेदाणे रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी पाणी गाळून घ्या.



# यूएस-इंडिया व्यापार चर्चेच्या आशेवर सहाव्या दिवशी तेजी
## सेन्सेक्समध्ये 324 अंकी उसळी, निफ्टीमध्येही वाढ

मुंबई, दि. १० प्रतिनिधी

भारतीय शेअर बाजाराने बुधवारीही आपली वाढ कायम ठेवली. निफ्टीने सलग सहाव्या दिवशी वाढ नोंदवली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासोबतच्या व्यापार अडथळ्यांवर चर्चा सुरू असल्याचे सांगितल्याने गुंतवणूकदारांचा उत्साह वाढला. याशिवाय वस्तू व सेवा कर (जीएसटी) कपातीच्या शक्यतेने आणि अमेरिकेच्या व्याजदर कपातीच्या अपेक्षेनेही बाजाराला चालना मिळाली.

बीएसई सेन्सेक्स ३२३.८३ अंकांनी (०.४%) वाढून ८१,४२५.१५ वर बंद झाला. तर एनएसई निफ्टी ५० निर्देशांक १०४.५० अंकांनी (०.४२%) वाढून २४,९७३.१० वर बंद झाला. ३० समभागांच्या सेन्सेक्समध्ये बीईएल, एचसीएल टेक्नॉलॉजीज, बजाज फायनान्स, ॲक्सिस बँक आणि टीसीएस या शेअर्समध्ये २% ते ४.३% वाढ झाली.

लघु व मध्यम आकाराच्या समभागांमध्येही तेजी दिसली. स्मॉल-कॅप ०.७% वाढले, तर मिड-कॅपमध्ये ०.९% वाढ नोंदली.

मंगळवारी ट्रम्प यांनी भारतासोबतच्या व्यापार अडथळ्यांवर चर्चा सुरू असल्याचे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींशी संवाद साधण्याचे संकेत दिल्यानंतर बाजारात उत्साह वाढला. यामुळे अनेक आठवड्यांपासून सुरू असलेल्या तणावानंतर आता तोडगा निघण्याची आशा गुंतवणूकदारांना वाटत आहे.

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडून पुढील आठवड्यात व्याजदर कपातीच्या शक्यतेमुळे आयटी शेअर्सना मोठी चालना मिळाली. गेल्या दोन सत्रांत आयटी क्षेत्रात ५.५% उसळी पाहायला मिळाली.

कापड कंपन्यांमध्येही तेजी

**सेन्सेक्स 81,425**

**निफ्टी 24,973**

दिसली. वेलस्पन लिव्हिंग, वर्धमान टेक्सटाईल्स, ट्रायडेंट आणि अरविंद या समभागांत ३.७% ते १०% वाढ झाली. यूएस-इंडिया व्यापार कराराच्या आशावादामुळे या कंपन्यांना गती मिळाली.


समुद्री अन्न निर्यातदारांमध्ये सर्वाधिक उसळी दिसली. एपेक्स फ्रोजनमध्ये १५.७% आणि अवंती फीडमध्ये १४.८% वाढ झाली. यामागे केवळ व्यापार कराराचा आशावादच नव्हे तर युरोपियन युनियनने भारतातील १०२ नव्या मत्स्य व्यवसाय युनिट्सना निर्यातीसाठी मंजुरी दिल्याचा सकारात्मक परिणामही दिसून आला.

ऑगस्ट महिन्यात इक्विटी म्युच्युअल फंड्समधील गुंतवणूक थोडीशी कमी झाली आहे. जुलै महिन्यात जिथे ४२,७०२ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती, तिथे ऑगस्टमध्ये ती घटून ३३,४३० कोटी रुपये झाली. म्हणजेच सुमारे २२% घट झाली आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये म्युच्युअल फंड्समध्ये ३८,२३९ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती.

# क्रॉस वोटिंगचा दावा भाजपाच्याच अंगलट?
## सुप्रिया सुळेंनी मांडले गणित

नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था

देशात उपराष्ट्रपती पदासाठी नुकतीच निवडणूक प्रक्रिया पार पडली. एनडीए विरुद्ध इंडिया आघाडी असा थेट सामना या निवडणुकीत पाहायला मिळाला. मतदानाच्या आधीपासूनच भाजपाप्रणीत एनडीएकडे विजयी आघाडी असल्याचे आकडे दिले जात होते. निकालदेखील एनडीएच्या बाजूने लागला असून सी पी राधाकृष्णन हे या निवडणुकीत विजयी झाले आहेत. मात्र, या निकालापेक्षाही सध्या चर्चा आहे ती निकालाच्या अनुषंगाने होणाऱ्या दावे-प्रतिदाव्यांची! एकीकडे भाजपाकडून क्रॉसवोटिंगचा दावा केला जात असताना आता त्यावर सुप्रिया सुळेंनी महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे.




पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातर्फे जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात आंदोलन करण्यात आलं. यावेळी खासदार सुप्रिया सुळेदेखील उपस्थित होत्या. प्रसारमाध्यमांनी यावेळी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी सविस्तर उत्तरे दिली. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत झालेलं क्रॉसवोटिंग व ते नेमकं कोणत्या पक्षाचं झालं याबाबतचे सत्ताधारी भाजपाचे दावे यासंदर्भात त्यांना विचारणा केली असता त्यांनी मतांचं गणित मांडलं.

सुप्रिया सुळेंनी यावेळी भाजपा नेते संजय जयस्वाल यांच्या विधानाचा दाखला दिला. "किती मतं फुटली? त्यांना जी १५ मतं जास्त मिळाली, ती शिवसेनेचीच होती हे त्यांनी मार्क केलं होतं का? हे मतदान गुप्त होतं. मग तुम्हाला कसं कळलं की ती मतं राष्ट्रवादीची होती की शिवसेनेची? काल भाजपाचे वरीष्ठ नेते संजय जयस्वाल यांनी विधान केलं की ४० मतं फुटली. ते म्हणतात ४० मधली ११ मतं वायएसआर काँग्रेसची आहेत. वाएसआर काँग्रेस हा इंडिया आघाडीचा मित्रपक्ष नाही", अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

"५ वर्षं जगनमोहन रेड्डींच्या नेतृत्वात ते भाजपाचा मित्रपक्ष आहेत. भाजपाने मित्रपक्ष बदलला. त्यांचे मित्रपक्ष त्यांच्या सोयीने बदलतात. जी ४० मतं ते आमच्या माथी मारतायत, त्यातली ११ मतं त्यांच्याच मित्रपक्षाची आहेत. भाजपा त्यांच्या सोयीने मित्र बदलते", असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

दरम्यान, गुप्त मतदान होऊनही कुठल्या पक्षाची किती मतं फुटली याचे दावे करणे म्हणजे वोटचोरीच असल्याचं सुप्रिया सुळे यावेळी म्हणाल्या. "मला मतदानासाठी दिलेल्या कागदावर कुठलाही क्रमांक किंवा रंग नव्हता. तिथे पांढराच रंग चालतो. जर हे गुप्त मतदान होतं, तर मग यांना कसं माहिती की कोणती मतं फुटली? यात काहीतरी गोलमाल दिसतोय. सत्तेतल्या लोकांना जर माहिती आहे की कुणाचं मतदान कुठे झालं, तर याचा अर्थ ही वोटचोरीच आहे", असा आरोप त्यांनी केला.

"१४ क्रॉसवोटिंग कोणत्या राज्यातून झालं? जर गद्दारी केली तर ती फक्त मराठी माणसानं केली असा त्यांना आरोप करायचा आहे का? १४ मतं फुटली म्हणजे ती महाराष्ट्राचीच फुटली असं कसं म्हणता येईल?" असा सवालही सुप्रिया सुळेंनी उपस्थित केला.

# चिनी तंत्रज्ञानाच्या मदतीने पाकिस्तानची 40 लाख फोनवर हेरगिरी

नवी दिल्ली, दि. १०वृत्तसंस्था

चिनी तंत्रज्ञानाच्या मदतीने पाकिस्तान जनतेची नाराजी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घालण्याया उद्देशाना लाखो नागरिकांवर पाळत ठेवत असल्याची माहिती ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या रिपोर्टमध्ये देण्यात आली आहे. ॲम्नेस्टी इंटरनॅशनलही एक आंतरराष्ट्रीय गैर-सरकारी संस्था असून जगभरात मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी काम करते.

या रिपोर्टनुसार पाकिस्तान सोशल मीडियावर सेन्सॉरशिप लावण्यासाठी चिनी बनावटीची इंटरनेट फायरवॉल वापरत आहे. याबरोबरच ते लॉफुल इंटरसेप्ट मॅनेजमेंट सिस्टीम (LIMS)च्या मदतीने एकाच वेळी ४० लाख मोबाईल फोनवर हेरगिरी करू शकतात.

या फायरवॉलचे नाव डब्लूएमएस २.० ( WMS 2.0) असे असून ही इंटरनेट ट्रॅफिकवर लक्ष ठेवते आणि एका वेळी २० लाख ॲक्टिव्ह सेशन्सना ब्लॉक करू शकते. मानवाधिकार संघटनेने माहिती दिली की, त्यांनी लायसनिंग करार, ट्रेड डेटा, लीक झालेल्या टेक्निकल फाईल्स आणि चिनी रेकॉर्ड्स तपासले ज्यामधून या फायरवॉल पुरवठादाराचे बीजिंगमधील सरकारच्या मालकीच्या कंपन्यांशी असलेले संबंध समोर आले.

ॲम्नेस्टीने सांगितले की, ही फायरवॉल अमेरिकेतील नियागरा नेटवर्क्स या कंपनीची उपकरणे, फ्रान्सच्या थेल्स (Thales) युनिटमधील थेल्स डीआयएस (Thales DIS) चे सॉफ्टवेअर, आणि चीनच्या एका सरकारी आयटी फर्मचे सर्व्हर वापरते.

रिपोर्टमध्ये म्हटले आहे की, "हे दोन मॉनिटरिंग सिस्टीम एकत्र काम करतात : एकामुळे गुप्तचर यंत्रणांना कॉल आणि मेसेज टॅप करता येतात, तर दुसरी देशभरातील वेबसाईट आणि सोशल मीडियाचा वेग कमी करते किंवा ते पूर्णपणे ब्लॉक करते."

"मोठ्या प्रमाणावर हेरगिरी केल्याने समाजात एक दहशतीचा इफेक्ट तयार होतो, ज्यामुळे लोक ऑनलाईन आणि ऑफलाईन त्यांचे हक्कांचा वापर करणे टाळतात," असेही रिपोर्टमध्ये म्हटले आहे. तसेच रिपोर्टमध्ये असेही म्हटले आहे की पाकिस्तान सध्या जवळपास ६५०,००० वेब लिंक्स ब्लॉक करत आहे आणि यूट्यूब, फेसबूक आणि एक्स अशा प्लॅटफॉर्म्स वापरण्यावर बंधने आणत आहे.

या रिपोर्टमध्ये एजन्सीज या एलआयएमएसच्या माध्यमातून किमान ४० लाख मोबाईल फोन्सवर एकाच वेळी पाळत ठेवत असल्याचा आरोप केला. तर डब्लूएमएस २.० हे एकाच वेळी २० लाख ॲक्टिव्ह सेशन्स ब्लॉक करते, असे अम्नेस्टीने म्हटले आहे.

# समृद्धी महामार्गावर खिळे ठोकून घातपाताचा प्रयत्न?

छ.संभाजीनगर, दि. १० वृत्तसंस्था

मुंबई ते नागपूरला जोडणारा हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा उद्घाटनापासूनच सातत्याने चर्चेत आहेत. या नवीन महामार्गावर आतापर्यंत अनेक अपघाताच्या घटना घडल्या असून अनेकांना यामध्ये आपला जीव गमवावा लागला आहे. या महामार्गाच्या बांधकामावरूनही अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. अशातच समृद्धी महामार्गावर खिळे ठोकण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे काही गाड्यांचे टायर फुटल्याने चालकांनी संताप व्यक्त केला. तसेच काही घातपात घडवण्यासाठी खिळे ठोकण्यात आले का असाही प्रश्न विचारला जात होता. मात्र आता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून याबाबत स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील समृद्धी महामार्गावर खिळे ठोकण्यात आल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. रस्त्यावर लावलेल्या खिळ्यांमुळे काही वाहनांचे टायर पंक्चर झाले. यामुळे वाहन चालकांनी संताप व्यक्त केला. या घटनेनंतर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने याबाबत महत्त्वाचा खुलासा केला आहे. समृद्धी महामार्गावर खिळे ठोकण्यात आले नसल्याचे एमएसआरडीसीकडून स्पष्ट करण्यात आलं. रस्त्यावरील सूक्ष्म तडे भरताना वापरण्यात आलेले 'ॲल्युमिनिअम नोजल्स' लावण्यात आल्याचे एमएसआरडीसीने सांगितले.

सदर ठिकाणी ट्रॅफिक डायव्हर्जनची सर्व समावेशक सुरक्षा व्यवस्था नसल्याचे दिसून आले. त्यामुळे संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येत आहे," अशी माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून देण्यात आली आहे.

# नेपाळमध्ये कारागृहातून १४ हजार कैदी फरार; भारतात अलर्ट

काठमांडू, दि. १० वृत्तसंस्था

भारताचा शेजारी देश नेपाळ सध्या सतत वाढत असलेल्या राजकीय संकटातून जात आहे. दरम्यान, नेपाळच्या कारागृहातून १४००० कैदी फरार झाल्याची माहिती समोर आली आहे. आंदोलकांनी कपिलवस्तू जेलवर हल्ला केला होता. त्यानंतर भारतात घुसखोरीची शक्यता वाढली आहे. इंडो-नेपाळ सीमारेषेवर एसएसबीने गस्त आणि सुरक्षा वाढवली आहे.

सिकटी विधानसभा क्षेत्रातील आमबाडीपासून सोनामनी गुदामपर्यंत प्रत्येक येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्तीची काटेकोर तपासणी सुरू आहे. महिलांची तपासणी महिला पोलीस कर्मचारी करत आहेत, तर पुरुषांची तपासणी पुरुष जवानांकडून केली जात आहे. वाहनांची सुद्धा बारकाईने तपासणी केली जात आहे. कुठल्याही संशयास्पद हालचालीची तात्काळ माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, एसएसबीने सीमारेषेवर अतिरिक्त तुकड्या आणि नजरेखाली ठेवणारी यंत्रणा (सर्व्हिलन्स) तैनात केली आहे. भारत-नेपाळ सीमारेषेची सुरक्षा एसएसबीच्या जबाबदारीखाली आहे आणि सध्याच्या परिस्थितीचा विचार करून अधिक कडक नजर ठेवण्यात येत आहे.

नेपाळी वंशाचे गीता कार्की, उपेन थापा, राग बहादूर श्रेष्ठ यांनी सांगितले की, अलीकडच्या काळात नेपाळमध्ये भ्रष्टाचार आणि इंटरनेट मीडियावरील बंदीच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर आंदोलन होत आहे. विशेष म्हणजे जेन-झीचे तरुण या चळवळीचं नेतृत्व करत आहेत. या दरम्यान नेपाळ सरकारने कर्फ्यू लागू केला आहे आणि रस्त्यावर सैन्य तैनात केले आहे.

# अनाथ मुलांसाठी काम करते 'साकार' संस्था



लोकसेवार्थ

कधी वंशाचा दिवा हवा म्हणून, तर कधी अनैतिक संबंधांचे परिणाम लपवण्यासाठी, काही निर्दयी जन्मदात्यांनी पोटच्या गोळ्याला रस्त्यावर सोडून दिल्याच्या बातम्या वाचून मन सुन्न होते. अशा घटनांवर आपण दु:ख व्यक्त करतो, रागही येतो, पण काही काळाने त्या घटना विसरल्या जातात. मात्र, या वंचित चिमुकल्यांना उब देण्याचं कार्य 1994 पासून छत्रपती संभाजीनगरमधील 'साकार' ही सामाजिक संस्था करत आहे.साकार ही संस्था ज्योती नगरमध्ये कार्यरत असून, रस्त्यावर टाकलेल्या किंवा अनाथ बालकांना घर आणि मायेची ऊब देते. 0 ते 6 वयाच्या लहान बालकांना सांभाळण्याची जबाबदारी ही संस्था पेलते. 20 बालकांना सामावून घेण्याची क्षमता असलेल्या या संस्थेत, 10 बालकांचा खर्च शासन करतं, तर उर्वरित 10 बालकांचा खर्च संस्था स्वत: उचलते.

1994 पासून आजपर्यंत साकारने 585 बालकांना आधार दिला आहे. त्यापैकी 425 बालकांचं पुनर्वसन यशस्वीपणे करण्यात आलं आहे. यात 186 मुलं आणि 235 मुलींचा समावेश आहे. विशेष म्हणजे, काही मुलांचं पुनर्वसन परदेशातही झालं आहे. स्पेशल चाइल्ड असणाऱ्या मुलांना परदेशात स्वीकारलं गेलं आहे, हे या संस्थेचं मोठं यश आहे.या संस्थेत मुलांना दत्तक देण्याची प्रक्रिया अतिशय नियमानुसार आणि पारदर्शक पद्धतीने केली जाते. साकारच्या अध्यक्षा, डॉ. नीलिमा पांडे म्हणतात, "आम्हाला चांगले आणि वाईट असे दोन्ही अनुभव आले आहेत. पण मुलांना नवीन आयुष्य देण्याचा जो आनंद आहे, तो शब्दात मांडता येणार नाही."साकारचं काम फक्त मुलांना सुरक्षित वातावरण देण्यापुरतं मर्यादित नाही. ती या मुलांचं संपूर्ण पुनर्वसन करत, त्यांना समाजात चांगलं आयुष्य मिळवून देण्याचा प्रयत्न करते. अशा संस्थेमुळेच वंचित बालकांचं आयुष्य एका चांगल्या दिशेला जातंय, हे नक्की.

लोकजागर

# महिलांसाठीची उद्योग मैत्रीण



महिलांनी स्वावलंबी व आत्मनिर्भर व्हावे, महिलांचा उद्योजकीय विकास आणि सर्वांगिण उन्नतीसाठी 'उद्योगमैत्रीण' हे मासिक सारिका भोईटे-पवार १४ वर्षांपासून प्रसिद्ध करतात. लघुउद्योगांच्या विविध संधी, उद्योगाच्या विविध योजना, यशस्वी उद्योजकांच्या यशोगाथा अशी माहिती मासिकामध्ये असते. हे मासिक नवीन उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्यांसाठी 'माहितीच कियॉस्क' आहे.

बहुतांश बाजारात स्त्रीविषयक मासिके फॅशन, ट्रेंड, कल्चर, रेसिपीवर फोकस करणारी असतात. त्यामुळे आधुनिक स्त्रीच्या गरजेप्रमाणे तिच्या व्यक्तिमत्त्वाचा चौफेर विचार करणारे आजच्या 'करिअर वुमन'ला आपलेसे वाटेल असे आणि प्रामुख्याने स्त्रियांना उद्योग सुरू करण्यास उद्युक्त करणारे मासिक सुरू करणे हे धाडसच होत. पण, सारिका यांचा निश्चय ठाम होता. आजची स्त्री सजग आहे. तिचे विश्व रांगोळी आणि मेहंदी पलीकडे जाऊन पोहोचले आहे, हे प्रभावीपणे मांडण्याची भूमिका मासिकाच्या माध्यमातून नक्कीच मांडली जाऊ शकते, हे त्यांनी हेरले आणि उद्योगविषयक मार्गदर्शनपर 'उद्योगमैत्रीण'चा श्रीगणेशा २००६ साली झाला. 'उद्योगमैत्रीण'च्या माध्यमातून 'आधुनिक उद्योग', 'लघुउद्योग', 'उद्योगनिर्मिती', 'उद्योग मार्गदर्शन', 'धडाडीचे उद्योजक', 'गाथा कर्तृत्वाची गाथा महाराष्ट्राची' असे अनेक विशेषांक प्रसिद्ध केले आणि हे विशेषांक वाचकांच्या पसंतीस पडले.

शून्यातून विश्व

'उद्योगमैत्रीण'च्या मासिकाचा पसारा केवळ ठाणे, मुंबईपुरता मर्यादित न ठेवता नाशिक, सांगली, पुणे, सातारा व महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यांमध्ये त्याच्या वितरणावर त्यांनी भर दिला. विविध उद्योगांच्या संधी,यशोगाथा अशांनी भरगच्च असेला अंक अल्पावधीतच वाचकांच्या पसंतीस पडू लागला.

उद्योगामध्ये बाळकडू घरातूनच सारिका यांना घरातूनच मिळाले. त्यांचे वडील मुळात उद्योजक. त्यामुळे उद्योगविषयक चर्चा लहानपणापासून कानावर पडत होती. शिवाय वडिलांच्या व्यवसायात त्यांचा सहभाग महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच झाला. कार्यालय व्यवस्थापन, उद्योगातील बारकावे, खाचखळगे, ग्राहकांचे स्नेहसंबंध आणि उद्योजकीय ठोकताळे या वडिलांच्या करड्या शिस्तीत शिकल्या.

बी.कॉमची पदवी, त्यानंतर जोडीला 'एमबीए इन फायनान्स', पत्रकारितेसाठी मास कम्युनिकेशन आणि जर्नालिझमचे तसेच कायद्याचे शिक्षण त्यांनी घेतले. जर्नालिझम करत असतानाच वर्तमानपत्रात स्त्री उद्योजकता, करिअरविषयक लिखाणाला सुरुवात केली. मुक्त पत्रकरिता करताना त्यांनी विविध वर्तमानपत्रात आपल्या लिखाणाची चुणूक दाखविली.

'उद्योगमैत्रीण' मासिकाची निर्मिती एवढ्यावरच न थांबता 'उद्योगमैत्रीण मार्गदर्शन आणि प्रशिक्षण संस्थे'ची स्थापना २००७ साली केली आणि या संस्थेमार्फत विविध प्रकारच्या व्यावसायिक मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन त्या करतात. केवळ व्यावसायिक मार्गदर्शनच नव्हे, तर प्रशिक्षण शिबिरांमध्ये प्लास्टिक इंडस्ट्री, पेपर इंडस्ट्री, ज्वेलर्स इंडस्ट्री, सर्व्हिस सेक्टरविषयक विविध तज्ज्ञ मार्गदर्शकांमार्फत त्यांनी दोन-तीन महिन्यांचे प्रशिक्षण शिबिरेसुद्धा आयोजित केली.उद्योगमैत्रीण' संस्थेमार्फत सुरू केलेल्या प्रशिक्षण केंद्रांमार्फत अनेक महिलांनी छोट्या स्तरावर आपले उद्योग सुरू केले आणि त्यांना सातत्याने मार्गदर्शन आणि पाठबळ संस्थेमार्फत देण्यात आले. त्यामुळे स्त्रियांचा उत्साह वाढू लागला. उद्योगात छोटी-छोटी उत्पादने सुरू होऊ लागली, पण उत्पादनांची विक्री कुठे करायची हा यक्षप्रश्न स्त्रीउद्योजकांना भेडसावणारा असतो, हे लक्षात घेऊन महिला उद्योजकांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी विक्री प्रदर्शनांचे आयोजनही 'उद्योगमैत्रीण' संस्थेमार्फत करण्यात येते. पहिल्या प्रदर्शनाचा अनुभव सांगताना सारिका भोईटे सांगतात, "पहिलवहिलं स्त्री उद्योजकांच्या उत्पादनांचे विक्री प्रदर्शन 'उद्योगमैत्रीणची उद्योग-व्यापार पेठ' असं होत. या प्रदर्शनात जवळजवळ ७५ स्त्रीउद्योजिका सहभागी झाल्या होत्या आणि पाच दिवसांच्या या प्रदर्शनांमध्ये स्त्रियांच्या उत्पादनांची छान विक्री झाली आणि नवउद्योजकींच्या उमेदीचं बळ वाढत गेले."

आज सारिका भोईटे-पवार ठाणे येथून स्त्रीउद्योजकांना मार्गदर्शनपर बिझनेस काऊन्सिलिंग सेंटर चालवतात. या सेंटरचा मूळ उद्देश नव्याने उद्योगात येऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांना उद्योग सुरू करण्यापासून ते मार्केटिंगपर्यंतचे दर्शन करणे. स्त्रीउद्योजकांसाठी शासनाच्या, बँकांच्या अनेक योजना आहेत. परंतु, कित्येकवेळा या योजनांची माहिती स्त्रियांना नसते. अशा सर्वांची माहिती केंद्रामार्फत दिली जाते. केवळ मुंबईतूनच नव्हे तर नाशिक, पुणे, कोल्हापूर, सातारा अशा ठिकाणांहून स्त्रिया दूरध्वनीवरून संपर्क साधून विशिष्ट दिवशी ठाणे येथे मार्गदर्शनासाठी येतात. उद्योग-व्यवसायाच्या सुरुवातीच्या काळात नवउद्योजकांपुढे अनेक अडचणी असतात. मुळात नेमका कोणता उद्योग निवडावा इथपासून कच्चा माल कुठे मिळेल, तयार मालाची विक्री कशी करावी, यंत्रसामग्री कुठे मिळेल, शासकीय नियम कोणते वगैरे प्रश्नचिन्ह त्यांच्यासमोर असतात. त्यासाठी एक छोटा अभ्यासक्रम त्यांनी तयार केला. स्टार्टअप्स उद्योजकांना ब्रॅण्डिंगविषयी त्या मार्गदर्शन करतात.

थोडक्यात, 'उद्योगमैत्रीण' या संस्थेची मुख्य उद्दिष्टे स्त्रियांना एकत्रित आणणे त्यांची व्यावसायिक मानसिकता निर्माण करणे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे असा आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# राधाकृष्णन यांना धनखडांचे पत्र

नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था

जगदीप धनखड यांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वी आरोग्याच्या कारणास्तव उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिला होता. राजीनामा दिल्यापासून त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नव्हती. याचबरोबर त्यांनी सार्वजनिक कार्यक्रमांपासून अंतर ठेवले होते. त्यामुळे विरोधी पक्षांतील नेत्यांनी त्यांच्याबाबत अनेक दावे केले होते. मात्र, आता राजीनाम्याच्या ५० दिवसांनंतर जगदीप धनखड यांनी पहिल्यांदाच मौन मोडले असून, उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्याबद्दल सी. पी. राधाकृष्णन यांचे अभिनंदन केले आहे. राधाकृष्णन यांचे अभिनंदन करताना जगदीप धनखड यांनी पत्रात लिहिले आहे की, "आदरणीय राधाकृष्णनजी, जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताचे उपराष्ट्रपती म्हणून निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन. या प्रतिष्ठित पदावरील तुमची निवड आपल्या देशाच्या लोकप्रतिनिधींचा विश्वास आणि आत्मविश्वास दर्शवते. सार्वजनिक जीवनातील तुमचा प्रचंड अनुभव पाहता, तुमच्या नेतृत्वाखाली हे प्रतिष्ठित पद निश्चितच अधिक आदर आणि वैभव प्राप्त करेल. या महत्त्वाच्या प्रसंगी, तुमच्या यशस्वी कार्यकाळासाठी आणि आपल्या महान देशाच्या सेवेसाठी माझ्या शुभेच्छा."

# एनआयएचे महाराष्ट्रासह देशभरात 22 ठिकाणी छापे

नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था

राष्ट्रीय तपास संस्थेनं आज सोमवारी दहशतवादी कट रचल्याप्रकरणी महाराष्ट्रासह देशातील ५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश जम्मू आणि काश्मीरमधील एकूण २२ ठिकाणी छापे टाकले.

एनआयए अधिकाऱ्याच्या माहितीनुसार, जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला, कुलगाम, अनंतनाग आणि पुलवामासह अनेक जिल्ह्यांमध्ये छापे टाकले जात आहेत. बिहारमध्ये 8 ठिकाणी, कर्नाटक, महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये प्रत्येकी एका ठिकाणी, उत्तर प्रदेशात दोन ठिकाणी आणि जम्मू-काश्मीरमध्ये ९ ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई एका व्यापक दहशतवादी कटाच्या चौकशीचा भाग आहे. या छाप्यांमध्ये अनेक डिजिटल डिव्हाइस, दस्तऐवज आणि संशयित लोकांकडून काही महत्त्वाची माहिती जप्त करण्यात आली आहे. एनआयए या संदर्भात पुढील तपास करत असून, देशातील सुरक्षेला धोका ठरणाऱ्या नेटवर्कचा शोध घेण्यासाठी ही मोहीम राबवली जात आहे.

### एनआयच्या वेगवेगळ्या पथकांनी एकाच वेळी ही छापेमारी केली

गुप्त माहितीनुसार, एनआयएच्या वेगवेगळ्या पथकांनी एकाच वेळी ही छापेमारी केली. संबंधित राज्य पोलिसांच्या सहकार्यानं ही कारवाई झाली आहे. देशविरोधी नेटवर्कशी संबंधित संशयित व्यक्तींच्या निवासस्थानांवर आणि परिसरांवर छापे टाकण्यात आले. या वर्षाच्या सुरुवातीला दाखल झालेल्या प्रकरणाचा तपास सुरुवातीला गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत होता. या प्रकरणाचं गांभीर्य आणि राष्ट्रीय सुरक्षेवरील संभाव्य परिणाम लक्षात घेता हे प्रकरण औपचारिकपणे एनआयए कडे वर्ग करण्यात आलं.

एनआयएच्या प्राथमिक तपासातून असं समोर आलं आहे की, हे नेटवर्क देशात अशांतता पसरवण्याच्या, कायदा आणि सुव्यवस्था अस्थिर करण्याच्या प्रयत्नात होते. या गटानं दहशतवादी फंडिंग गोळा करणे, भरती मोड्यूल्स तयार करणे आणि स्लीपर सेल सक्रिय ठेवणे यासाठी प्रयत्न केल्याचा एनआयएला संशय आहे. गेल्या काही महिन्यांत, एनआयएनं देशभरात अशाच प्रकारच्या कारवाया करून अनेक संशयितांना अटक केली आहे. हे सर्वजण बंदी घालण्यात आलेल्या दहशतवादी संघटनांशी संबंधित होते. ऑनलाइन आणि ऑफलाइन माध्यमातून तरुणांना कट्टरपंथी बनवण्याचा प्रयत्न करत असल्याचं उघड झालं होतं.

केंद्र सरकारनं दहशतवादाविरुद्ध 'झीरो टॉलरन्स' धोरण स्वीकारलं आहे. याच पार्श्वभूमीवर, सुरक्षा यंत्रणांना देशाच्या सुरक्षिततेला धोका ठरू शकणाऱ्या घटकांविरुद्ध कठोर आणि प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# राजकीय लढाईसाठी न्यायालयाचा वापर करु नका : सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था



तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्याविरोधातील प्रदेश भाजपची याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळली. राजकीय लढाईसाठी न्यायालयाचा वापर करु नका, अशी टिप्पणी यावेळी सरन्यायाधीश बी. आर. गवई, न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन आणि न्यायमूर्ती अतुल एस. चांदुरकर यांच्या खंडपीठाने केली.

२०२४ च्या लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी पक्षाविरोधात बदनामी करणारे वक्तव्य केल्याचा आरोप प्रदेश भाजपने केला होता. त्यावरुन भाजपने मानहानीचा खटला दाखल केला. मात्र, तेलंगणा उच्च न्यायालयाने हा मानहानीचा खटला रद्द करण्याचा आदेश दिला. उच्च न्यायालयाच्या आदेशाला तेलंगणा भाजपने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने देखील तेलंगणा भाजपची याचिका फेटाळून लावली. या प्रकरणात हस्तक्षेप करणार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.

आम्ही वारंवार सांगत आहोत की सर्वोच्च न्यायालयाचा वापर राजकीय लढाईसाठी करू नका. जर तुम्ही राजकारणी असाल तर तुमची चामडी जाड असायला हवी, असे खंडपीठाने म्हटले. राजकारणी असाल तर तुमच्याकडे या सर्व गोष्टी सहन करण्याची क्षमता असली पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

दरम्यान, भाजपने दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यात रेवंत रेड्डींवर आरोप करण्यात आले होते. रेड्डी यांनी काँग्रेस पक्षाशी संगनमत करून भाजप आरक्षण संपवेल अशी "खोटी आणि संशयास्पद राजकीय वक्तव्य" केली असा आरोप खटल्यात केला होता. ऑगस्ट २०२४ मध्ये ट्रायल कोर्टाने रेड्डी यांना नोटीस बजावली. त्यानंतर काँग्रेस नेत्याने उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने १ ऑगस्ट रोजी मानहानीचा खटला रद्द करण्याचे आदेश दिले.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन.** **PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**